## केंद्र पुरस्कृत योजना

# साक्षर भारत

मानव संसाधन विकास मंत्रालय,
शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, भारत सरकार
शास्त्री भवन, नवी दिल्ली

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ५ |
| २. | उद्दिष्टे | ७ |
| | लक्ष्य | ८ |
| | लक्ष्यनिश्चित दृष्टिकोन | ८ |
| | महिला | ८ |
| | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अल्पसंख्यांक | ९ |
| | किशोर/कुमारवयीन बालके | ९ |
| | भौगोलिक क्षेत्र व्याप्ती | १० |
| | ग्रामीण आणि अन्य विशेष क्षेत्र | १० |
| | शहरी भागांसाठी व्यूहरचना | १० |
| ३. | साक्षरतेसाठी शाश्वत मागणी निर्माण करणे | १० |
| ४. | अध्यापन - अध्ययन कार्यक्रम | ११ |
| | व्यावहारिक/कार्यात्मक साक्षरता कार्यक्रम | ११ |
| | कार्यक्रमाची उद्दिष्टे | ११ |
| | कार्यक्रमाचा आराखडा/रुपरेषा | १२ |
| | लवचिक दृष्टिकोन/पध्दत | १२ |
| | स्वयंसेवक आधारित जनमोहीम | १२ |
| | स्वयंसेवक आणि शिकाऊ व्यक्तींना प्रेरणा/प्रोत्साहन | १३ |
| | केंद्राधारित दृष्टिकोन/पध्दत | १३ |
| | निवासी शिक्षक | १३ |
| | निवासी शिबिर | १३ |
| | अर्धनिवासी शिबिरे-अर्ध स्वयंसेवक आधारित पध्दत | १४ |
| | प्राथमिक/मूलभूत शिक्षण कार्यक्रम | १४ |
| | व्यावसायिक शिक्षण (कौशल्य विकास) कार्यक्रम | १४ |
| | निरंतर शिक्षण कार्यक्रम | १५ |
| ५. | अध्ययन-अध्यापन कार्यक्रमासाठी कृती आराखडा | १६ |
| | लोकशिक्षण केंद्र (प्रौढशिक्षण केंद्र) | १७ |
| ६. | संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन | १७ |
| | प्रौढ साक्षरतेसाठी गाभा अभ्यासक्रम आराखडा | १७ |
| | उच्च गुणवत्तापूर्ण अध्यापन - अध्ययन साहित्य (TLM) | १८ |

| अ.क्र. | घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | साक्षरता शिक्षकांचा गुणवत्ता विकास | १८ |
| | अध्यापन आणि अध्ययन गुणवत्तेत वाढ करणे | १९ |
| | मूल्यमापन आणि प्रशस्तिपत्रक | २० |
| | नवीन शिक्षण तंत्रज्ञान | २० |
| | साक्षरता वातावरणाचा प्रसार | २१ |
| | साधन सहाय्य | २१ |
| ७. | कार्यक्षमता व्यवस्थापन | २२ |
| | विविध खात्यांतील समन्वय आणि भागीदारी | २२ |
| | सार्वजनिक-सार्वजनिक भागीदारी | २२ |
| | अशासकीय संघटना/संस्था | २२ |
| | सार्वजनिक खाजगी भागीदारी | २२ |
| | आंतरराष्ट्रीय भागीदारी | २३ |
| | कागदपत्रे/दस्तऐवज | २३ |
| | संशोधन | २४ |
| | संनियंत्रण आणि मूल्यमापन | २४ |
| | निधी वितरण व्यवस्थापन | २४ |
| | नियोजन | २५ |
| | मार्गदर्शक तत्वे | २५ |
| | नियोजन प्रक्रिया | २६ |
| | व्यवस्थापन आराखडा | २६ |
| ८. | वित्त आणि नियोजन | २८ |
| ९. | राष्ट्रीय साक्षरता कोष | २८ |
| १०. | मैलाचे दगड/महत्वाचे टप्पे | २८ |
| ११. | योजनेचा कालावधी | २९ |
| १२. | मार्गदर्शक बाबी | २९ |
| | जोडपत्र - १ सूचक व्यवस्थापन संरचना | ३१ |
| | जोडपत्र - २ (प्रौढ महिला साक्षरता ५० % किंवा कमी असलेल्या जिल्ह्यांची यादी) | |
| | जोडपत्र - ३ उपक्रमानुसार आर्थिक नियम | |

# साक्षर भारत

## १. प्रस्तावना

१. दिनांक ८ सप्टेंबर २००९ रोजी, आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनी शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग (DSEL) मानव संसाधन विकास मंत्रालय (MHRD) भारत सरकार (GOI) चा 'साक्षर भारत' हा उपक्रम पंतप्रधानानी सुरू केला. ज्या प्रौढांना औपचारिक शिक्षण मिळू शकलेले नाही आणि ते शिक्षण मिळवण्याचे वयही त्यांनी पार केले आहे, त्यांना साक्षरता, प्राथमिक/मूलभूत शिक्षण (औपचारिक शिक्षण समकक्ष), व्यावसायिक शिक्षण (कौशल्य विकास), शारीरिक व भावनिक विकास, व्यावहारिक कला, उपयोजित विज्ञान, क्रीडा आणि मनोरंजनाचे शिक्षण घेण्याची गरज भासत असल्यास त्यांना शिक्षणाचे विकल्प/संधी उपलब्ध करून देऊन प्रौढांचे, विशेषतः महिलांच, सबलीकरण करणे, असा या उपक्रमाचा व्यापक उद्देश आहे.

२. १५-३५ च्या वयोगटातील निरक्षरांना व्यावहारिक साक्षरता उपलब्ध करून देण्यासाठी १९८८मध्ये कालबध्द राष्ट्रीय साक्षरता अभियान (NLM) सुरू करण्यात आले. नवव्या व दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी (मार्च २००७) NLM ने संपूर्ण साक्षरता मोहिमेद्वारे (TLC) ५९७ जिल्हे, साक्षरोत्तर कार्यक्रमांद्वारे (PLP) ४८५ जिल्हे आणि निरंतर शिक्षण कार्यक्रमांद्वारे (CEP) ३२८ जिल्हे व्यापले होते. याचा परिणाम म्हणून १२७. ४५ दशलक्ष व्यक्ती साक्षर झाल्या त्यापैकी ६०% महिला होत्या तर २३% साक्षर हे अनुसूचित जातीतील (SCs) आणि १२% अनुसूचित जमातीतील (STs) होते.

३. या अभियानाच्या लक्षणीय यशानंतरही निरक्षरता हा कायम राष्ट्रीय पातळीवरील चिंतेचा विषय राहिला. आता या क्षणी जरी सध्याची निरक्षरांची नेमकी संख्या उपलब्ध नसली आणि ती २०११ च्या जनगणनेनंतरच ज्ञात होणार असली तरी २००१च्या जनगणनेनुसार देशात १५ वर्षापेक्षा अधिक वयोगटातील निरक्षर प्रौढांची संख्या २५९.५२ दशलक्ष इतकी होती. तसे पाहता प्राथमिक शिक्षणातील वाढीव गुंतवणूक लक्षात घेता प्रौढ निरक्षरांच्या संख्येत लक्षणीय घट अपेक्षित आहे. मात्र त्याचवेळी लोकसंख्या शास्त्राच्या आलेखाप्रमाणे शाळा गळतीच्या त्याच प्रमाणातील गुणोत्तरामुळे या संख्येत वाढ होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. साक्षरतेमध्ये लिंगनिहाय, सामाजिक आणि धार्मिक तफावत अजूनही कायम आहे. यासाठीच प्रौढ शिक्षण अपरिहार्य आहे कारण त्यामुळेच औपचारिक शिक्षणाद्वारे साक्षरता पातळी वाढवण्याच्या आणि टिकवण्याच्या प्रयत्नांना पाठबळ मिळते.

४. याच कारणास्तव, अकराव्या पंचवार्षिक योजनेतही राष्ट्रीय साक्षरता अभियान सुरुच ठेवण्याची आवश्यकता लक्षात घेतली गेली. प्रौढ साक्षरता वाढीसाठी प्रयत्न सुरू ठेवणे आणि ते प्रभावी करण्याची आवश्यकता तत्वतः मान्य करत नियोजन आयोगाने अकराव्या योजनेच्या कालावधीत

राष्ट्रीय साक्षरता मिशन चालू ठेवण्यास मान्यता दिली. या अभियानाचे प्रारंभापासून मूल्यमापन करावे आणि समकालीन आव्हानांना तोंड देता येईल या प्रकारे त्यात सुधारणा कराव्यात, अशा अटींवर ही मान्यता देण्यात आली. त्या अनुषंगाने या कार्यक्रमाचा अंतर्बाह्य पुनर्आढावा घेऊन मूल्यमापन केले गेले.

५. या सखोल मूल्यमापनात या कार्यक्रमाचे स्वरुप, आराखडा आणि अंमलबजावणी पध्दतीत काही विशिष्ट कमतरता उघड झाल्या, त्यातील ठळक बाबी म्हणजे एका व्यवहार्य भारतीय पद्धतीला अनुरूप अशा कायमस्वरूपी उपाय योजनेचा अभाव, ऐच्छिक सहभागावरील मर्यादा, कार्यक्रमात राज्य सरकारचा मर्यादित सहभाग, समन्वयाचा अभाव, निकृष्ट व्यवस्थापन आणि पर्यवेक्षण यंत्रणा, लोकसहभागाचा अभाव, निकृष्ट संनियंत्रण आणि अपुरा निधी.

६. दरम्यान, महिला उध्दार आणि सबलीकरणासाठी साक्षरता कार्यक्रम हे मुख्य साधन असल्याचे शासनाने जाहीर केले. शासनाच्या शालेय शिक्षण, आरोग्य, पोषण, कौशल्य विकास आणि महिला सबलीकरणाला चालना देण्याच्या प्रयत्नात महिला निरक्षरतेचे सातत्य अडथळा निर्माण करते. महिला साक्षरता ही या सर्व सामाजिक विकास कार्यक्रमाला जोरदार प्रोत्साहन देणारी ठरेल अशी शासनाची अपेक्षा आहे. तथापि महिला साक्षरतेचे हे केवळ साधनभूत मूल्य आहे. त्याचे अंगभूत मूल्य म्हणजे स्त्रीच्या उद्धारासाठी तिच्यात निर्णायक जाणीव निर्माण करणे, जेणेकरून ती तिच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवू शकेल, सध्या ती ज्याप्रकारे वर्ग, जात आणि लिंगाधारित अक्षमता/ दुबळेपणा आणि वंचिततेला तोंड देते आहे, त्या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी तिला सक्षम करणे हे या कार्यक्रमाचे खरे उद्दिष्ट आहे.

७. महिला सक्षमीकरणाचे ध्येय असणाऱ्या सरकारच्या एकूण धोरणाच्या अनुषंगाने आणि साक्षरता, विशेषतः महिला साक्षरता, ही सामाजिक आर्थिक विकासासाठीची पूर्वावश्यकता आहे हे लक्षात घेता महिला साक्षरतेवर लक्ष्य केंद्रित करत राष्ट्रीय साक्षरता अभियानाची एक कार्यक्रम साधन म्हणून पुनर्रचना करण्याची अत्यावश्यकता जाणली गेली. या अभियानाच्या पुनर्स्थापनेने साक्षरता चळवळीला पुनर्जिवित करण्यास मोठा हातभार लागू शकेल, हे सुध्दा लक्षात घेतले गेले, कारण प्रभावी समाज जागृतीच्या सुरुवातीच्या दशकानंतर साक्षरता चळवळ गेली दोन दशके क्षीण झाली होती.

८. हे अभियान पुन्हा सुरू करण्यासाठी या प्रक्रियेला हातभार लावणाऱ्या देशभरातील घटकांशी संवाद साधण्याची प्रदीर्घ प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. संपूर्ण देशभरात राज्य शासन - अशासकीय संघटना - साक्षरता कार्यकर्ते- व्यवस्थापन - प्रशासक - राज्य साधन केंद्र - विद्यापीठ - सामाजिक कार्यकर्ते आणि अन्य संबंधित घटकांसमवेत गंभीर बैठका घेण्यात आल्या. दिनांक ३०/ ०६/२००९ रोजी सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांसमवेत संपूर्ण योजनेच्या विस्तारपूर्वक व्यूहरचनेवर चर्चा करण्यात आली. दिनांक २०-०८-२००९ रोजी त्या संपूर्ण योजनेला राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाच्या परिषदेने मान्यता दिली आणि त्यानंतर दिनांक ३१/८/२००९

रोजी ही योजना शिक्षणासंबंधीच्या केंद्रीय सल्लागार मंडळासमोर ठेवण्यात आली.

९. संपर्क अभियाना दरम्यान संवादात संबंधित घटकांचे सर्वसाधारण मत होते की या नव्या अभियानाने हे ध्यानात घेतलंच पाहिजे की समाजाच्या तळागाळात झालेल्या मोठ्या प्रमाणावरील बदलांच्या अनुषंगाने महिला साक्षरतेची मागणी वाढली आहे तसेच गेल्या काही वर्षात नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत, उदा. ७३ व्या घटना दुरुस्ती नंतरची पंचायत राज संस्थांची दोलायमानता, संघटित स्वयंरोजगार कार्यक्रम राबवणारे स्वयंसहाय्यता गट (SHG), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NREGA) तसेच संयुक्त वन व्यवस्थापन गट इ. एकत्रित कामांद्वारे प्रगती साधणारे नवे प्रभावी संघटनात्मक भांडवल पुढे आले आहे.

१०. या सर्व पार्श्वभूमीवर 'साक्षर भारत' ही योजना सध्यापेक्षा वेगळी केली गेली. महिला साक्षरतेवर भर असला तरी सुध्दा साक्षर भारत १५ आणि त्यापेक्षा अधिक वयाच्या सर्व प्रौढांना समावून घेईल. केवळ पूर्वीच्या कमतरता दूर करूनच नव्हे तर अनेक नव्या वैशिष्ट्यांसह ही योजना सुरू करण्यात आली आहे. प्राथमिक साक्षरता, साक्षरोत्तर कार्यक्रम आणि निरंतर शिक्षण ही क्रमवार टप्प्यांची साखळी होण्यापेक्षा एक अखंड प्रक्रिया बनेल. याशिवाय स्वयंसेवकाधारित व्यापक अभियानामुळे प्रौढ शिक्षणाला एक वैकल्पिक दृष्टिकोन मिळण्याची तरतूद झाली आहे. लोक शिक्षण केंद्रांची (AECs) स्थापना करून त्याद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यक्रमांचा समन्वय आणि व्यवस्थापन पाहिले जाईल. पूर्वीच्या योजनेतील जिल्ह्यांऐवजी आता राज्य सरकार, पंचायत राज संस्था आणि स्थानिक समूह प्रमुख घटकांची भूमिका निभावतील. एका अत्यंत प्रभावी संनियंत्रण आणि मूल्यमापन यंत्रणेची स्थापना केली जाईल. अखेरीस, परंतू महत्त्वाचे म्हणजे आर्थिक साहाय्य पुरेशा प्रमाणात वाढवले जाईल.

११. साक्षर भारत ची अंमलबजावणी १-१०-२००९ पासून होईल. राष्ट्रीय साक्षरता अभियान योजनेचा कालावधी जरी दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंतच वैध होता तरी, अभियानाअंतर्गत उर्वरित उपक्रम ३०-०९-२००९ पर्यंत चालू ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती, एक विशेष बाब म्हणून सध्या चालू असलेले उपक्रम या वाढीव मुदतीत पूर्ण करणे शक्य झाले होते. साक्षर भारतच्या सुरुवातीनंतर राष्ट्रीय साक्षरता अभियानाचे संपूर्ण कार्यक्रम आणि उपक्रम ३०-०९-२००९ रोजीच संपुष्टात आले.

## २. उद्दिष्टे

१२. या अभियानाची चार व्यापक उद्दिष्टे अशी —

(अ) निरक्षर आणि अंकगणना न जाणणाऱ्या प्रौढांना कार्यात्मक साक्षरता आणि अंकगणिताचे ज्ञान देणे.

(ब) प्राथमिक साक्षरतेनंतरही शिक्षण चालू ठेवून औपचारिक शिक्षण व्यवस्थेशी समकक्षता संपादित करण्यासाठी प्रवृत्त नवसाक्षर प्रौढांना करणे.

(क) निरक्षर आणि नवसाक्षरांसाठी गरजानुरूप कौशल्य विकास कार्यक्रम राबवणे जेणे करून त्यांचे उत्पन्न आणि जीवनस्तर यात सुधारणा होईल.

(ड) नवसाक्षर प्रौढांना निरंतर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिकणारा समाज विकसित करणे.

### लक्ष्य

१३. वय वर्ष १५ आणि पुढील ७० दशलक्ष प्रौढांना व्यावहारिक साक्षरता देणे हे, या अभियानाचे मुख्य लक्ष्य आहे. अभियानाचे दुसरे साह्यकारी लक्ष्य म्हणजे १. ५ दशलक्ष प्रौढांना प्राथमिक शिक्षण कार्यक्रमात आणि तितक्याच प्रौढांना व्यावसायिक (कौशल्य विकास) कार्यक्रमात सामावून घेण्याचे आहे. या उद्दिष्टांतर्गत अभियान मुख्यत्वे महिलांवर लक्ष्य केंद्रित करेल परंतु तेवढ्या पुरतेच मर्यादित राहणार नाही. याशिवाय अन्य महत्त्वाचे गट म्हणजे अनुसूचित जाती (SCs), अनुसूचित जमाती (STs), अल्पसंख्यांक, अन्य वंचित घटक आणि साक्षरतेचे प्रमाण कमी असणाऱ्या राज्यांच्या ग्रामीण भागातील कुमारवयीन मुले. लक्ष्य केंद्रित करावयाच्या प्रत्येक गट आणि क्षेत्रासाठी एक निश्चित उद्दिष्ट ठरवले जाईल तसेच प्रत्येक उद्दिष्टासाठी एक सुस्पष्ट दृष्टिकोन आणि योजना तयार केली जाईल.

**साक्षरता कार्यक्रमांतर्गत प्रवर्गानुसार उद्दिष्टे (संख्या दशलक्षात)**

| प्रवर्ग | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | ४ | १० | १४ |
| अनुसूचित जमाती | २ | ६ | ८ |
| मुस्लिम | २ | १० | १२ |
| अन्य | २ | ३४ | ३६ |
| एकुण | १० | ६० | ७० |

## लक्ष्यनिश्चित दृष्टिकोन

### महिला

१४. महिला या मुख्य लक्ष्य आणि प्रमुख सहभागी घटक असल्याने संपूर्ण कार्यक्रम महिलांच्या दृष्टीने बनवला जाईल. अध्यापन - अध्ययन कार्यक्रम तयार करतांना महिलांना ज्या लिंगनिहाय तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते, त्याचा विचार केला जाईल. लिंगभेद हा एक वेगळा/स्वतंत्र घटक म्हणून नाही तर जात, वंश, धर्म, अपंगत्व इत्यादींच्या जोडीने विचारात घेतला जाईल. दृष्टिकोन, व्यूहरचना, योजना, व्यवस्थापन यंत्रणा, अध्यापन-अध्ययन साहित्य आणि संनियंत्रण व मूल्यमापन यांसह या कार्यक्रमाच्या सर्व अंतर्भूत घटकांमध्ये लिंग सापेक्षता

समाविष्ट असेल. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक आणि ग्रामीण भागातील अन्य वंचित घटकांमधील स्त्रियांना विशेष प्राधान्य दिले जाईल.

१५. याविषयीचा दृष्टिकोन म्हणजे, महिलांचे सध्याचे ज्ञान तसेच त्यांची साक्षरता आणि अंकज्ञान पातळी कायम ठेवणे जेणेकरून पुढे या पातळ्यांमध्ये हळूहळू सुधारणा होईल आणि त्यांच्या स्वतःशी संबंधित कौशल्यांचा वापर करण्याची क्षमता त्यांच्यात येईल. विषयाधारित किंवा समस्याधारित साक्षरतेसह महिला साक्षरतेशी निगडीत नाविन्यपूर्ण, प्रयोगशील आणि पारखलेले कार्यक्रम अधिक विस्तारित केले जातील.

१६. शिकाऊ महिलांना या कार्यक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यासाठी महिलांना मोठ्या संख्येने स्वयंसेवक आणि शिक्षक म्हणून नेमले जाईल.

**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अल्पसंख्यांक**

१७. अनुसूचित जाती (१५%), अनुसूचित जमाती (८%) आणि अल्पसंख्यांक (२०%) यांनी एकत्रितरित्या भारताच्या लोकसंख्येचा ४०% हून अधिक भाग व्यापला आहे. निरक्षर लोकसंख्येत अनुसूचित जाती २०. ५% आणि अनुसूचित जमाती १२% आहेत. अल्पसंख्यांक विशेषतः मुस्लिमांनी निरक्षर लोकसंख्येचा एक आणखी मोठा भाग व्यापला आहे. या घटकांचा केवळ एकूण लोकसंख्येतील हिस्साच नाही तर निरक्षर लोकसंख्येतील हिस्सा विचारात घेऊन उद्दिष्ट निश्चिती करण्यात आली आहे. त्यांची साक्षरता पातळी वाढविण्यासाठी स्रोतांमध्ये गुंतवणूक करावी SLMA/राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण आणि अन्य राज्य पातळीवरील अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांची समाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन विशेष योजना आखल्या पाहिजेत आणि त्या बाबत NLM/राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणांशी समन्वय साधला पाहिजे. नियोजन आणि अंमलबजावणी, आराखडा आणि प्रक्रियेत संबंधित समाजांसाठी व्यापक भूमिका अंतर्भूत करणे गरजेचे आहे. संनियंत्रण यंत्रणेत एक असे अंतर्भूत वैशिष्ट्य असेल जे या घटकातील शिकाऊ व्यक्तींच्या प्रगतीवर सतत लक्ष ठेवेल. तसेच त्यांना पुन्हा निरक्षरतेकडे जाण्यापासून परावृत्त करण्यासाठी उपाययोजना करेल.

**किशोर/कुमारवयीन बालके**

१८. अशिक्षित/अर्धशिक्षित कुमारांसाठीच्या सध्याच्या शैक्षणिक कार्यक्रमांच्या आराखडा माध्यमाचा प्रमुख पैलू म्हणजे फलनशीलता, लैंगिक वर्तन, नियोजित पालकत्व इ. होय. या कुमारांच्या प्रत्यक्ष जीवनातील गरजांच्या पूर्तीसाठी नाविन्यपूर्ण योजना आखून त्या अंतर्भूत केल्या जातील ज्याद्वारे, प्रमाणित असलेली व्यावहारिक/व्यावसायिक पात्रता संपादित करता येईल. हा कार्यक्रम म्हणजे प्राथमिक शिक्षण आणि व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण असा संयुक्त उपक्रम असेल. कुमारांच्या गरजांसाठी शिबिरामधील मार्गदर्शन अधिक सुयोग्य आढळले. अशा नाविन्यपूर्ण गोष्टींसाठी हे अभियान लवचिक दृष्टिकोन ठेवून पुरेसा वाव देईल.

**भौगोलिक क्षेत्र व्याप्ती**

१९. या अभियानाचे आणखी एक उद्दिष्ट म्हणजे प्रादेशिक आणि राज्यांची अंतर्गत तसेच परस्परांमधील तफावत कमी करणे होय. आंतरराज्यीय तफावत ही ३३% ते ८८% दरम्यान आहे. राज्यांच्या अंतर्गत असणारी विषमताही इतकीच धक्कादायक आहे. प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात म्हणजे अकराव्या योजना कालावधीत (३१-०३-२०१२) हा कार्यक्रम २००१च्या जनगणनेनुसार प्रौढ महिला साक्षरता दर ५०% किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या जिल्ह्यांपुरताच मर्यादित असेल. अशा जिल्ह्यांमध्ये जवळपास १८ कोटी निरक्षर प्रौढ आहेत. त्याचप्रमाणे, नक्षलवादाचा प्रभाव असलेले ३३ जिल्हेही या अभियानात सामावून घेतले जातील.

**ग्रामीण आणि अन्य विशेष क्षेत्र**

२०. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील निरक्षरांपैकी ८४% लोक ग्रामीण भारतात राहतात. शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागात निरक्षरता अधिक मोठ्या प्रमाणात असल्याने आणि चांगल्या शैक्षणिक पायाभूत सुविधांमुळे शहरी भागात शिक्षणाच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध असल्याने अभियान ग्रामीण क्षेत्रावर लक्ष्य केंद्रित करून तिथेच सार्वजनिक स्त्रोतांचा उपयोग करेल. साक्षर भारत अभियान बिगर-ग्रामीण क्षेत्राकडे विस्तारित करण्यापूर्वी प्रथम ग्रामीण क्षेत्र पूर्णतः व्यापले जाईल. या क्षेत्रातील अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्यांक आणि अन्य वंचित गटातील महिला आणि कुमारवयीन बालकांवर लक्ष केंद्रित केले जाईल.

**शहरी भागांसाठी व्यूहरचना**

२१. शहरी भागात नव्या कृती योजना वापरुन नाविन्यपूर्णरित्या अभियानाची उद्दिष्टे साध्य केली जातील. हा कार्यक्रम जन शिक्षण संस्थान, राज्य साधन केंद्रे, अशासकीय संघटना, सामाजिक गट तसेच सार्वजनिक-खाजगी भागीदारी, राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने निवडलेली कोणतीही संस्था त्यांच्याद्वारे किंवा अन्य प्रकारेही हाताळला जाईल. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत गृह आणि शहरी दारिद्रय निर्मूलन मंत्रालयाशी संपर्क दृढ करता येऊ शकेल. ज्याद्वारे संसाधनांमध्ये वृध्दी करता येईल.

## ३. साक्षरतेसाठी शाश्वत मागणी निर्माण करणे

२२. अनेक भागांमध्ये साक्षरतेसाठी स्पष्ट मागणी दिसते तर काही ठिकाणी ती ध्वनित असते त्यामुळेच ती गरज आणखी स्पष्ट/उघड करणे आवश्यक आहे. शिक्षित आणि अशिक्षित विशेषतः महिलांसह संपूर्ण समाजाला साक्षरतेबाबत समुपदेशन करून अनुकूल सामाजिक वातवरण निर्माण करण्यावर या अभियानाचे यश अवलंबून आहे. ही मागणी निर्माण करण्याचे मुख्य सूत्र म्हणजे शिकाऊ व्यक्तींना तसेच स्वयंसहाय्यता गट, पंचायत राजसंस्था, इतर समूहाधारित गट आणि स्वयंसेवी संस्थांमधील महिलांना त्यांच्या दैनंदिन जीवनात साक्षरतेचे मूल्य, महत्त्व आणि संदर्भ स्पष्ट रुपाने

समोर दाखवणे हेच आहे. यासाठीच राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण एक मोठी सामाजिक जाणीव-जागृती आणि प्रोत्साहनपर मोहीम राबवणार असून त्याद्वारे साक्षरतेचे फायदे आणि निरक्षरतेचे तोटे व्यापक प्रसिध्दीद्वारे जनतेपर्यंत पोहोचवेल. हा संदेश इतक्या प्रभावीपणे पोचवला जाईल की साक्षरतेचा मुद्दा हा सामाजिक चर्चेचा विषय बनेल आणि निरक्षरांना विशेषतः महिलांना शिकण्यात आणि शिक्षितांना या कार्यक्रमात योगदान देण्यास प्रवृत्त करेल.

२३. साक्षरतेसाठीच्या वातावरण निर्मिती मागील मध्यवर्ती हेतू म्हणजे साक्षरतेसाठी सकारात्मक, स्वाभाविक आणि उत्स्फूर्त मागणी निर्माण करणे जी देशाच्या सर्व भागात समान नाही. याबरोबरच वातावरण निर्मिती कार्यक्रमांद्वारे साक्षरतेसंबंधीची मानसिकता आणि सर्व पूर्वग्रहदूषित संकल्पना दूर केल्या जातील. तसेच साक्षरता प्रसार प्रयत्नांना नागरी समाजातील सर्व प्रवर्गांचा आधार मिळवला जाईल. स्थानिक परिस्थितीला अनुसरुन बहुआयामी व्यूहरचना केल्या जातील. छपाई, इलेक्ट्रॉनिक आणि लोक माध्यमांसह माध्यमांचे सर्व प्रकार एकाच वेळी कामाला लावले जातील आणि त्याद्वारे अपेक्षित साक्षरता स्वयंसेवक आणि शिकाऊ व्यक्तींना जागृत करून प्रोत्साहित केले जाईल. राज्य साधन केंद्र आणि इतर संस्थांनी तयार केलेले माहिती, शिक्षण आणि संवाद साहित्य साक्षरतेसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी व्यापक प्रमाणात वापरले जाईल. वातावरण निर्मिती माहितीचा एक भाग म्हणून गाव, पंचायत आणि गट पातळीवर सामाजिक व राजकीय नेते, पंचायत राज कार्यकर्ते, महिला मंडळ, शैक्षणिक संस्था आणि समाजातील बुध्दीजीवी वर्गासह बैठका आणि कार्यक्रम आयोजित केले जातील. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने निश्चित केल्याप्रमाणे एक सुकाणू समिती आणि सहाय्यक समिती अभियानाचे राष्ट्रीय पातळीवर पर्यवेक्षण करेल आणि समन्वय ठेवेल. प्रायोजकत्वाशिवाय व्यवस्थापन प्रमुखांकडील निधी यासाठी वापरला जाऊ शकेल.

## ४. अध्यापन-अध्ययन कार्यक्रम

२४. साक्षरतेची मागणी आणि निरक्षर तसेच नवसाक्षरांच्या विविधांगी गरजा पूर्ण करण्यासाठी व्यावहारिक साक्षरता कार्यक्रम, मूलभूत शिक्षण कार्यक्रम, व्यावसायिक शिक्षण आणि निरंतर शिक्षणासह एक/सपूर्ण अखंड अध्ययन - अध्यापन कार्यक्रमांचा वैविध्यपूर्ण संच सादर केला जाईल.

## व्यावहारिक/कार्यात्मक साक्षरता कार्यक्रम

### कार्यक्रमाची उद्दिष्टे

२५. साक्षरता कार्यक्रम या योजनेचे साध्य करण्याचे पहिले उद्दिष्ट म्हणजे निरक्षर प्रौढांना कार्यात्मक साक्षरता देणे. कार्यात्मक/व्यावहारिक साक्षरता म्हणजे वाचन, लेखन, संख्याज्ञान यात स्वावलंबी होणे, आपल्या वंचिततेची जाणीव होऊन संघटनात्मकरित्या तसेच विकास प्रक्रियेत सहभागी होऊन आपल्या परिस्थितीतून आपला स्वतःचा उद्धार करण्याकडे वाटचाल करणे, आर्थिक स्तर आणि

सर्वसामान्य जीवनस्तर उंचावण्यासाठी कौशल्य संपादित करणे, जागरुक आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे. (राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, पर्यावरण संवर्धन, महिला समानता आणि पुनर्निर्मिती ही मूल्ये आत्मसात करणे)

**कार्यक्रमाचा आराखडा/रुपरेषा**

२६. या कार्यक्रमांतर्गत सर्वेक्षणाद्वारे निरक्षरांना शोधले जाईल, त्यांच्या अध्ययन गरजा क्षेत्रवार निश्चित केल्या जातील आणि शिकाऊ व्यक्तींचा प्रेरक उत्साह आणि स्थानिक परिस्थितीनुसार त्याला तीन महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीत ३०० तासांचे निदेशक आधारित अध्यापन दिले जाईल. त्यानंतर ३०० तासांचे निदेशनात्मक अध्ययन यशस्वीरित्या पूर्ण केलेली व्यक्ती अनोळखी मजकूर वाचू आणि समजू शकेल (उदा. वर्तमानपत्रातील मथळे, रस्त्यांवरील खुणा इ. ) दैनंदिन जीवनात लेखन कौशल्य वापरू शकेल उदा. - अर्ज आणि पत्र लिहिणे, अर्ज नमुने भरणे इ. आणि गुणाकार भागाकारासह साधी गणितंही सोडवू शकेल. अध्ययन निष्पत्तीचे व्यावसायिक मूल्यमापन केल्यानंतर प्रत्येक यशस्वी साक्षराला एक प्रमाणपत्र दिले जाईल. यामुळे त्याला मुक्त अध्ययन पध्दतीतील संधी खुल्या होतील. शिकाऊ व्यक्तींच्या सोईनुसारच साक्षरता वर्गांची वेळ आणि स्थळ ठरवले जाईल. शाळेच्या वेळा आणि सुट्या यानुसार साक्षरता वर्ग आणि संबंधित उपक्रमांसाठी सर्व शिक्षा अभियानाच्या शाळा इमारती उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करणे ही राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाची जबाबदारी असेल.

**लवचिक दृष्टिकोन/पध्दत**

२७. व्यापक दृष्टीने मोहिम राबवणे ही जरी प्रामुख्याने योजना असली तरी संपूर्ण देशभरात समसमान रितीने पोहोचणे हा योजनेचा हेतू आहे. संदर्भ विशेष आणि गटविशेष अशा वैविध्यपूर्ण मार्गांनी प्राथमिक साक्षरता पोहोचवली जाते आहे याची खात्री करण्यासाठी नवीन उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल. तसेच मंजूर खर्चाच्या व्यापक मर्यदित प्रकल्प मंजूरीसाठी शिथिल/लवचिक निर्णय घेतले जातील. खाली नमूद केलेल्या नमुना मार्ग उदाहरणांसह अंमलबजावणी संस्था अन्य कोणताही नमुना/मार्ग किंवा त्यांचा संयुक्त वापर अंमलात आणू शकतात.

**स्वयंसेवक आधारित जनमोहीम**

२८. या अंतर्गत स्वयंसेवकांद्वारे मोठ्या प्रमाणात अध्यापन होईल. सरासरी ८-१० व्यक्तींच्या गटाला साक्षरता कौशल्य देण्यासाठी स्वयंसेवक हा प्रेरक, प्रशिक्षक आणि शिक्षक म्हणून कार्य करेल. संभाव्य शिक्षणार्थींची तसेच स्वयंसेवकांची निवड करणे, त्यांचे अनुरुप गट बनवणे, त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे, शिकाऊ व्यक्ती आणि स्वयंसेवकांना साक्षरता संच पुरवणे, अध्ययनकर्ता-अध्यापकांच्या प्रत्येक गटाच्या प्रगतीचा आलेख ठेवणे, अध्ययनाची गती कमी होणार नाही याची खात्री करणे त्याचवेळी शिकणाऱ्या व्यक्तींच्या सोयीनुसारच वर्गाची जागा/स्टाफ आहे ना याची खात्री करून घेणे या सर्व गोष्टीसाठी कृतीपातळीवर अंमलबजावणी संस्था जबाबदार असतील.

**स्वयंसेवक आणि शिकाऊ व्यक्तींना प्रेरणा/प्रोत्साहन**

२९. स्वयंसेवी साक्षरता शिक्षकांना कोणताही मोबदला दिला जाणार नाही. स्वयंसेवी साक्षरता शिक्षकांची प्रेरक पातळी चिंताजनक असल्याने त्यांना विविध मार्गांनी प्रेरणा/प्रोत्साहन देण्याची गरज आहे, उदा. अन्य प्रेरक गोष्टी आणि बक्षिसांशिवाय त्यांच्या योगदानाबद्दल विविध पातळ्यांवर त्यांना लोकमान्यता देणे. राज्यशासन ग्रामपंचायती किंवा राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण साक्षरता शिक्षकांना मानधन देण्याबाबत विचार करू शकते, त्यासाठी देणग्या किंवा सार्वजनिक-खाजगी भागीदारी यासारख्या निधी स्रोताचा वापर करता येऊ शकेल मात्र भारत सरकारचे निधी साहाय्य यासाठी उपलब्ध नाही.

३०. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण/जिल्हा/ग्रामपंचायत एखाद्या नाविन्यपूर्ण मार्गाने शिकाऊ व्यक्तीना प्रोत्साहन/प्रेरणा देण्याबाबतची शक्यता तपासू शकतात.

## केंद्राधारित दृष्टिकोन/पध्दत

**निवासी शिक्षक**

३१. पात्रताधारक स्वयंसेवक एखाद्या विशिष्ट गावातीलच रहिवासी असेलच असे संभव नसल्याने त्या गावाबाहेरील किंवा समूहाबाहेरील निदेशक नेमून त्याला त्या गावात राहण्यास सांगितले जाईल तसेच त्याला शिकाऊ व्यक्तींना निदेशनात्मक अध्यापन देणे आणि त्यांना प्राथमिक साक्षरता अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी साहाय्य करण्यास सांगितले जाईल. एका वर्षाच्या कालावधीत कमीत कमी ३० शिकाऊ व्यक्तीसाठी सरासरी एका निवासी निदेशकाची आवश्यकता असेल. निवासी निदेशकाला राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने निश्चित केलेले मानधन दिले जाईल.

३२. या पध्दतीने केंद्र दिवसातील ७-८ तास कार्यरत राहिल आणि शिकाऊ व्यक्ती/गट त्यांना उपलब्ध वेळेनुसार दोन तास किंवा अधिक वेळासाठी वर्गात शिकण्यासाठी येतील. निदेशकाची निवड करताना विशेष करून त्यांची लिंगसमानता आणि जातीसमानतेबाबतची संवेदनशिलता, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेसंबंधीच्या घटनात्मक मूल्यांविषयीची निष्ठा यांचा विचार केला जाईल. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण निवासी निदेशकांची किमान शैक्षणिक पात्रता आणि निवड प्रक्रिया निश्चित करेल.

**निवासी शिबिर**

३३. वय वर्षे १५-२५ या वयोगटातील अशा कुमारवयीन आणि तरुणांसाठी विशेषतः निवासी शिबिरे आयोजित केली जातील. ज्यांनी इयत्ता चौथी पाचवीपर्यत यापूर्वीच प्राथमिक शिक्षण पूर्ण केले असेल मात्र सातत्याच्या अभावाने जे पुन्हा निरक्षरतेकडे गेले असतील, ज्यांनी शाळा सोडून दिली आणि आता पुन्हा शाळेत जाण्याच्या दृष्टीने ज्यांचे वय जास्त आहे, आणि सूत्रबध्द शिक्षणातून जे वगळले गेले आहेत अशा निवडक तरुण आणि किशोरांना निवासी शिबिरात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केले जाईल. आणि साधनव्यक्तीच्या गटांच्या सहाय्याने गटातील एका सोयीच्या ठिकाणी शिबिर

आयोजित केले जाईल. निवासी शिबिरे ही स्वयंसेवी संस्था, राज्य साधन केंद्रे, जन शिक्षण संस्थान यांच्यामार्फत घेतली जातील मात्र त्यासाठी त्यांच्याकडे अनुभव आणि तज्ज्ञ व्यक्ती असणे आवश्यक आहे.

## अर्धनिवासी शिबिरे-अर्ध स्वयंसेवक आधारित पध्दत

३४. ही पध्दत शिकाऊ व्यक्तींच्या विशिष्ट गटासाठी उपयुक्त आहे, उदा. स्वयंसहाय्यता गट, महिला गट, ग्रामपंचायत सदस्य किंवा समान उद्देशाने संघटित झालेला समूह यातील निरक्षर सदस्य आजच्या घडीला देशात अशा प्रकारचे अनेक गट आहेत आणि त्यापैकी अनेक गट कर्जपुरवठा आणि बचतीचे कार्य करतात. सोईच्या काळात आयोजित शिबीरात प्राथमिक/मूलभूत शिक्षण कार्यक्रम राबवला जाईल, त्यावेळी या विखुरलेल्या लाभधारकांची सोय स्वयंसेवी पध्दतीने अध्ययन करण्यासह पाहीली जाईल. ही शिबिरे शिकाऊ व्यक्तींना, त्यांनी पूर्वनिर्धारित पातळीपर्यंत साक्षरता कौशल्य प्राप्त करावे यासाठी, पात्र बनवतील. त्याचवेळी त्यांचे जीवन आणि कार्यस्थिती बद्दल चर्चा, वादविवाद करण्यासाठी त्यांना संधी देतील.

## प्राथमिक/मूलभूत शिक्षण कार्यक्रम

३५. या कार्यक्रमाची रचना योजनेचे दुसरे उदिष्ट साध्य करण्यासाठी केली गेली आहे, ते उद्दिष्ट म्हणजे नवसाक्षरांनी प्राथमिक शिक्षणानंतर त्यांचे अध्ययन चालू ठेवावे आणि औपचारिक शिक्षण पध्दतीशी समकक्षता प्राप्त करावी. जोपर्यंत प्रौढ औपचारिक शाळा किंवा मुक्त अध्ययन व्यवस्थेत इयत्ता तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी आणि त्यापुढे समकक्षता मिळवत नाहीत. राष्ट्रीय मुक्त शालेय संस्था (NIOS) ने आणि अन्य मुक्त शाळांनी सुरू केलेले मुक्त प्राथमिक/मूलभूत शिक्षण कार्यक्रम (OBE) यासाठी एक सुरुवातीचा टप्पा म्हणून स्वीकारले जातील. समकक्षता कार्यक्रम आखताना प्रौढ साक्षरांचा जीवनानुभव आणि स्थानिक ज्ञान विचारात घेतले जाईल.

## व्यावसायिक शिक्षण (कौशल्य विकास) कार्यक्रम

३६. निरक्षर आणि नवसाक्षरांना त्यांच्या राहणीमान आणि आर्थिक स्थितीत सुधारणा आणण्यासाठी व्यावसायिक कौशल्यांनी सुसज्ज बनवणे या योजनेतील तिसऱ्या उदिदष्टाच्या दृष्टीने ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे किंवा ज्यांनी शिक्षणच घेतलेले नाही अशा व्यक्तीना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाईल. या योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्थांना प्रौढशिक्षण कार्यासाठी साहाय्य करण्यासाठी आणि कौशल्य विकासासाठी स्थापन केलेल्या जनशिक्षण संस्था प्रौढशिक्षण केंद्राशी जोडल्या जातील, ज्यायोगे ते कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच व्यावसायिक प्रशिक्षणासह साक्षरता देऊ शकतील. जिल्हा पातळीवर अंमलबजावणी संस्थेशी समन्वय साधून जनशिक्षण संस्था कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी सुयोग्य नवसाक्षरांची नोंद करतील. या अभियानांतर्गत विशिष्ट आर्थिक तरतूद असणाऱ्या विशिष्ट उपक्रमांशिवाय जनशिक्षण संस्था आपल्या कार्यक्रम निधीच्या वापरातूनही

व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण देईल.

३७. कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या संधी ग्रामपंचायत पातळीपर्यंत नेण्यासाठी राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण आणि जिल्हा पातळीवरील अंमलबजावणी संस्था या सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील अन्य संस्थांशी समन्वय प्रस्थापित करून समांतर पातळीवर प्रयत्न करतील.

## निरंतर शिक्षण कार्यक्रम

३८. निरंतर शिक्षण कार्यक्रमाचे लक्ष्य म्हणजे या योजनेचे चौथे उदिदष्ट साध्य करणे, ते म्हणजे नवसाक्षर आणि लक्ष्यांकित लाभार्थ्यांना जीवनभर शिक्षण घेण्याची संधी पुरवण्यासाठी शिकणाऱ्या समाजाची स्थापना करणे. प्राथमिक आणि साक्षरोत्तर कार्यक्रम आणि आपल्या शर्ती व सोयीनुसार प्रौढ साक्षरांची कौशल्य वाढीची संभाव्य गरज यामुळे निर्माण झालेली शिक्षणाची मागणी कार्यक्रमात ओळखली गेली आहे. निरंतर शिक्षण कार्यक्रम आपल्या नावाप्रमाणेच कायमस्वरुपी आयोजित केला जाईल. आणि अन्य तीन कार्यक्रमांप्रमाणे त्याला विशिष्ट कालमर्यादा नसेल. यामागील दृष्टिकोन असा की, एक कायमस्वरूपी अध्ययन वातावरण निर्माण व्हावे, जेणेकरून शिकणाऱ्या व्यक्तींना त्यांची साक्षरतेची इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांची शिक्षणाची भूक भागवण्यासाठी त्यांना या कार्यक्रमातील सोयीसवलतींचा लाभ घेता यावा.

३९. या कार्यक्रमांतर्गत वाचनालय आणि वाचनकक्ष सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. तसेच हळुहळू अन्य समकालीन माहिती संवाद तंत्रज्ञानाची उपकरणेही पुरवली जातील. या कार्यक्रमांतर्गत अल्प कालावधीचे अभ्यासक्रम उदा. आरोग्य जागृती, देखभाल, आहार आणि पोषण, जलसंधारण, पिण्याचे पाणी, जलनिस्सारण, लोकसंख्या आणि विकास शिक्षण, एड्स, गुप्तरोग, लैंगिक शिक्षण, ग्राहक जागृती, ग्राहकाधिकार, विधी साक्षरता, माहिती अधिकार कायदा किंवा शिकणाऱ्याच्या रुचीचा अथवा जीवनाशी निगडीत विषयावरच्या अन्य कोणत्याही प्रकारचा अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला जाईल.

४०. योजनेच्या अंमलबजावणीसाठी कार्यक्रमांतर्गत व्यापलेल्या जिल्ह्यामधील पंचायतींमध्ये १.७० लाख लोकशिक्षण केंद्रे (प्रौढशिक्षण केंद्रे) स्थापन केली जातील. काही विशिष्ट जिल्ह्यांमध्ये यापूर्वीच मंजूर केलेल्या निरंतर शिक्षण केंद्रांमध्ये ही केंद्रे अंतर्भूत असतील. राज्य सरकारे स्वतःच्या खर्चातून किंवा सार्वजनिक खाजगी भागिदारीतून सध्याची निरंतर शिक्षण केंद्रे आणि जिल्ह्यातील प्रमुख/नोडल निरंतर शिक्षण केंद्रे जी या कार्यक्रमात समाविष्ट नाहीत, ती चालवू इच्छित नसेल तर ती बंद करण्यात यावी. यासंदर्भात ग्रामपंचायतीनाही प्रस्ताव देता येईल. या कार्यक्रमांतर्गत सध्याची निरंतर शिक्षण केंद्रे चालू ठेवण्यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाकडून विशिष्ट परवानगी/मान्यता घ्यावी लागेल.

४१. लोकशिक्षण केंद्र हे त्याच्या कार्यक्षेत्रातील शिकाऊ व्यक्तींची सर्व अध्ययन-अध्यापन उपक्रमांसाठी नोंदणी करण्याचे काम करेल. साक्षरता मोहिमेचे मध्यवर्ती चैतन्य केंद्र अशी या केंद्राची भूमिका

असेल. ते पुढील जबाबदाऱ्या पार पाडेल, शिकाऊ व्यक्ती आणि स्वयंसेवकांचा शोध घेणे, शिकाऊ व्यक्तांचे गट करून त्यांना अनुरुप स्वयंसेवक देणे, त्यांचे प्रशिक्षण, शिकणाऱ्या व्यक्ती आणि स्वयंसेवकांना साक्षरता संच पुरवणे, शिकणाऱ्या, शिकवणाऱ्या गटाच्या प्रगतीचा मागोवा घेत लेखाजोखा ठेवणे, जनजागृती उपक्रमासाठी प्रमुख/नोडल केंद्र उभारणे, तांत्रिक केंद्र उभारणे, अन्य विभागांतर्फे विषयाधारित अभ्यासक्रमासाठी केंद्र उभारणे, उदा. कृषी, पशुसंवर्धन, आणि पशुवैद्यक, मत्स्यव्यवसाय, पुष्पशेती, रेशीमउत्पादन, हातमाग, हस्तव्यवसाय, आरोग्यशिक्षण, ग्रामीण विकास, नागरी विकास, महिला आणि बालविवास, अनुसूचित जाती -जमाती-इतर मागासवर्गीय विकास/कल्याण, पंचायतराज, विज्ञान आणि तंत्रज्ञान इ. किंवा अन्य स्थानिक मागणी आधारित अभ्यासक्रम, वाचनालय आणि वाचनकक्ष सुविधा देणे, गटचर्चेसाठी जागा उपलब्ध करून देणे, व्यावसायिक आणि कौशल्य विकास तसेच अन्य विभागांसाठी विस्तार सुविधा, क्रीडा, साहसी उपक्रम, करमणूक, सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे, एक परिपूर्ण माहिती खिडकी आणि माहिती केंद्र उभारणे जे अभियानाशी निगडीत अन्य उपक्रमांसह प्रौढशिक्षणाचे कार्य करेल.

## ५. अध्ययन-अध्यापन कार्यक्रमासाठी कृती आराखडा

४२. लोकशिक्षण केंद्र हे अभियानाचा उजवा हात म्हणून गाव पातळीवर कार्य करेल आणि अभियानांतर्गत समाविष्ट सर्व उपक्रम राबविण्यास जबाबदार असेल उदा. साक्षरता, प्राथमिक/मूलभूत शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि निरंतर शिक्षण जे त्या केंद्राच्या कार्यक्षेत्रात राबवले जातील. प्रशासकीय आणि शैक्षणिक कार्यपूर्तीसाठी दोन प्रेरक मानधनावर नेमले जाऊ शकतात. प्रेरकांना अध्यापनाची जबाबदारीही दिली जाऊ शकते. स्वयंसेवी शिक्षकांसमवेत ते गावात साधन गट स्थापन करू शकतात. केंद्रांना स्वतःच्या इमारती नसल्यास पंचायती आणि अन्य संबंधित विभागांनी सहकार्य करावे आणि केंद्रांना पंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी केंद्र इ. ठिकाणी काम करण्यास परवानगी द्यावी. अशा केंद्राच्या उभारणीसाठी नंतर निधी उपलब्ध करून दिला जाऊ शकेल.

४३. प्राथमिक/मूलभूत शिक्षण कार्यक्रम आणि निरंतर शिक्षण कार्यक्रम मुख्यत्वे केंद्राधारीत असल्याने स्वयंसेवी शिक्षकाधारित साक्षरता कार्यक्रम गावामध्ये तात्पुरत्या साक्षरता केंद्रात चालवले जातील. ही केंद्रे साधारणतः औपचारिक क्षेत्रातील शाळांच्या समकक्ष असतील. ज्याप्रकारे औपचारिक क्षेत्रात एकशिक्षकी शाळा चालवल्या जातात त्याप्रकारे ती साक्षरता शिक्षक/निवासी शिक्षकाद्वारे त्याच पध्दतीने चालवली जातील. अशी अधिकाधिक केंद्रे ही वंचित घटकांच्या रहिवास क्षेत्रातच कार्यरत व्हावीत. प्रौढ निरक्षरांच्या संख्येनुसार ग्रामपंचायत असणाऱ्या गावांमध्ये, खेडयांमध्ये आवश्यक तेवढी साक्षरता केंद्रे उभारली जातील. एका साक्षरता केंद्रात ८-१० निरक्षर असतील. कार्यक्रमातील तरतुदीनुसार या शिक्षण केंद्रांना किमान भौतिक शैक्षणिक सुविधा, अध्ययन-अध्यापन साहित्य इ. पुरवले जाईल.

## लोकशिक्षण केंद्र (प्रौढशिक्षण केंद्र)

४४. साक्षरता आणि निरंतर/आजीवन शिक्षणाला गाव पातळीपर्यंत संस्थात्मक, व्यवस्थापनात्मक आणि साधन सहाय्य पुरवण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर सुसज्ज अशी बहुकार्यात्मक लोकशिक्षण केंद्रे स्थापन केली जातील. पाच हजार लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतीत एक प्रौढशिक्षण केंद्र उभारले जाईल. जर ग्रामपंचायतीची लोकसंख्या ५००० पेक्षा अधिक असेल तर अतिरिक्त प्रौढशिक्षण केंद्र उभारले जाईल. प्रौढ शिक्षण केंद्रात दोन पगारी समन्वयक (प्रेरक) कंत्राटी पध्दतीने नेमले जातील. ग्रामपंचायतीने उपलब्ध करून दिलेल्या इमारतीत प्रौढशिक्षण केंद्र चालतील. प्रेरक हा प्राधान्याने अनुसूचित जाती/जमाती/अल्पसंख्याक गटातील असावा आणि त्यापैकी किमान एक महिला असावी. प्रेरक हा किमान दहावी उत्तीर्ण असावा.

## ६. संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन

## प्रौढ साक्षरतेसाठी गाभा अभ्यासक्रम आराखडा

४५. साक्षरता कार्यक्रमासाठीच्या अनेकविध उद्दिष्टांमुळे साक्षरता कार्यक्रमाच्या अभ्यासक्रमांकडे बहुविध मागण्या केल्या गेल्या आहेत. तशा प्रकारचा अभ्यासक्रम अधिक चांगल्या शिक्षण परीणामांसाठी हितकारक असेल. त्याचवेळी गुणवत्तेच्या किमान पातळीच्या प्रमाणीकरणाचीही आवश्यकता आहे. प्राथमिक/मूलभूत शिक्षण आणि निरंतर शिक्षण शिक्षण पातळी संदर्भात राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण गाभा अभ्यासक्रम आराखडा विकसित करेल. या आराखडयात मुख्य अभ्यासक्रमाची क्षेत्रे आणि स्थानिक प्रश्न, अध्यापन - अध्ययन पध्दती आणि साक्षरता शर्ती आणि अन्य उद्दिष्टपूर्तीसाठीची प्रक्रिया, रेखाटतांना त्यातील अंतर्भूत घटक आणि त्यांची सर्वसमावेशकता स्पष्ट करून सांगितली जाईल.

४६. या अभ्यासक्रमात राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक सलोखा, महिला समानता, छोटया कुटुंबाचे महत्त्व इ. राष्ट्रीय मूल्ये प्रतिबिंबित होतील. हा अभ्यासक्रम शिकाऊ व्यक्तींच्या गरजा पूर्ण करेल तसेच त्यांची सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी, जीवनानुभव, भाषिक कौशल्य आणि प्रेरक पातळी यांतील वैविध्यांचाही विचार करेल. या अभ्यासक्रमाचा आराखडा, या अभियानाची व्यापक सामाजिक उद्दिष्टे आणि त्यांचा स्थानिक संदर्भ तसेच संधीची व्यापकता यात संतुलन साधेल. आराखडा अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शक गोष्टी नेमून देईल ज्यांमध्ये शिकण्यातही रुची कायम ठेवण्यास मदत करणारी प्रक्रिया आणि पध्दती तसेच गळती रोखण्याचे उपाय अंतर्भूत असतील तसेच शिकाऊ व्यक्तींच्या मूल्यमापनासाठी शैक्षिणिक निष्पत्तींची पातळी आणि शर्ती, शिक्षण मूल्यमापन पध्दतीसाठी मार्गदर्शन, शिकाऊ व्यक्तीने करावयाचे स्वयंमूल्यांकन यांचही स्पष्ट स्वरुप सांगितलेले असेल.

४७. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण या आराखडयावर आधारित अभ्यासक्रम स्थानिक संदर्भातील प्रश्न आणि पैलूंना प्रतिबिंबित करून विकसित करू शकेल.

## उच्च गुणवत्तापूर्ण अध्यापन - अध्ययन साहित्य (TLM)

४८. एक समान उच्च गुणवत्तेची खात्री करून घेण्यासाठी मूलभूत शिक्षण, समकक्षता आणि निरंतर शिक्षणाच्या सर्व साहित्याच्या गुणवत्तेची खात्री राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण किंवा राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीकडून केली जाईल. या समितीमध्ये प्रौढशिक्षण, स्त्री-पुरुष समानता, भाषा आणि प्राधान्य क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असेल. समकक्षता उपक्रमाच्या दृष्टीने समितीमध्ये औपचारिक शिक्षण आणि मुक्त शिक्षण पध्दतीमधील तज्ज्ञांचाही समावेश असेल.

४९. विविध भाषांमधील अध्यापन-अध्ययन साहित्याचा विकास तसेच शैक्षणिक साहित्यातील गुणवत्ता आणि स्वरुप यांचे प्रौढांच्या पातळीपर्यंतचे सुयोग्य सादरीकरण याबाबतची प्रमाणकं ठरवून ही समिती त्याबद्दल मार्गदर्शनही करेल. त्यामध्ये साक्षरता, कौशल्य विकास, समकक्षता आणि अजीवन शिक्षणाचे मुख्य घटक हे राहणीमान, सामाजिक - सांस्कृतिक वास्तवता, समस्या - आधारित आणि विषयाधारित पैलू उदा. स्त्री-पुरुष समानता NREGS, RTI, PRI, SHG, आरोग्य आणि निरोगीपणा, पर्यावरण, कृषी, पशुसंवर्धन इ. च्या संदर्भाने समाविष्ट असतील. हे साहित्य समकक्षता, मुक्त शाळा पध्दती संदर्भात राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने निश्चत केलेल्या अध्ययन पातळी गाठण्यासाठी दिशा दर्शनाचे काम करील. व्यावसायिक पध्दतीने निर्माण केलेल्या अध्यापन -अध्यायन साहित्याचा मूळ नमूना जपून ठेवण्यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण व्यवस्था करेल.

५०. असे साहित्य विहित दर्जा राखणारे आहे याची खूण म्हणून त्यावर मान्यतेचा शिक्का/प्रतीक असेल. केवळ समितीने मान्यता दिलेलेच साहित्य या कार्यक्रमात उपयोगात आणले जाईल. अध्यापन-अध्ययन साहित्य हे शिकणाऱ्यांच्या आवडीच्या भाषेत बनवले जाईल. साक्षरतेची प्रायमर्स, अन्य साक्षरोत्तर साहित्य तसेच निरंतर शिक्षण अध्यापन-अध्ययन साहित्याचा विकास, उत्पादन आणि वितरण यात नॅशनल बुक ट्रस्ट, राज्य पाठ्यपुस्तक महामंडळ यासारख्या शासकीय संस्थांबरोबरच अन्य अशासकीय संस्था आणि खाजगी क्षेत्रालाही सामावून घेतले जाईल.

### साक्षरता शिक्षकांचा गुणवत्ता विकास

५१. प्रौढांना शिकवणे ही एक कला असून त्यासाठी विशिष्ट कौशल्यांची आवश्यकता असते. त्यामुळेच या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गुणवत्ताधारक शिक्षक ही एक पूर्णावश्यकता आहे. या कार्यक्रमात व्यावसायिक शिक्षक नेमण्याची तरतूद नसल्याने अगदी थोडा अनुभव असणाऱ्या किंवा पूर्ण अननुभवी स्वयंसेवकांवरच भिस्त आहे. त्यामुळेच त्यांची नेमणूक करतांना आणि साक्षरता कार्यक्रमादरम्यानही त्यांना उच्च गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देण्यात येईल. ते स्थानिक भाषेच्या माध्यमातून असेल. प्रशिक्षणासाठी असा ओघवता दृष्टिकोन असेल ज्यायोगे आजचे प्रशिक्षणार्थी उद्याचे प्रशिक्षक बनू शकतील. कार्यक्रमाचे मुख्य लक्ष्य महिला आणि अन्य वंचित गट असल्याने

साक्षरता शिक्षकात स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक सांस्कृतिक समस्यांबाबत संवेदनशीलता जागृत करण्यात येईल. अंकगणित प्रशिक्षणावर विशेष लक्ष दिले जाईल.

५२. यानंतर केंद्रीय प्रौढशिक्षण संचालनालय आणि राज्य साधन केंद्रांची क्षमता विकसित करून त्यांना हेतूपूर्वक राज्यातील गुणवत्ता प्रशिक्षणात सामील करून घेतले जाईल ज्यात अभ्यासक्रमाची तयारी, प्रशिक्षण हस्तपुस्तिका, प्रशिक्षण योजना, प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि प्रशिक्षणाशी निगडीत अन्य घटक समाविष्ट असतील. तसेच त्यांना महिलाबरोबरचे कार्य, त्यांची जागृती, महिलांच्या समाजिक वास्तवाला साक्षरतेशी जोडणे आणि अभियानातील इतर कार्यक्रमांबद्दल माहिती देण्यात येईल.

५३ जिल्ह्यातील प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी एक मुख्य मध्यवर्ती साधन संस्था म्हणून जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था (DIET), जिल्हा साधन केंद्र, जनशिक्षण संस्थान आणि अन्य व्यावसायिक संघटनांचे एक जाळे विकसित करण्यात येईल. महिला साक्षरता आणि सक्षमीकरणाबाबत कार्य केलेल्या शासकीय आणि अशासकीय स्वयंसेवी संस्था, महिला संघटना यांनाही प्रशिक्षण आयोजनात सहभागी करून घेतले जाईल.

**अध्यापन आणि अध्ययन गुणवत्तेत वाढ करणे**

५४. या कार्यक्रमाचा सर्वाधिक भर आहे तो साक्षरतेची पातळी कायम राहील याची खात्री करण्यावर आणि त्यासाठीच अध्यापन-अध्ययन प्रक्रिया ही अधिक सहभागात्मक असली पाहिजे आणि शिकाऊ व्यक्ती तिच्या केंद्रस्थानी असली पाहिजे. अधिकाधिक चांगल्या अध्यापन-अध्ययन पध्दती स्वीकारल्या पाहिजेत, उदा. समवयस्कांबरोबर अध्ययन, बहुआयामी अध्यापन, गटचर्चा, खेळातून शिक्षण, निसर्ग भेट, उपक्रम आधारित शिक्षण इ. या सोबतच अध्यापन सहाय्यक साहित्य म्हणजे भित्तीचित्रे, तक्ते, पूरकवाचन साहित्य, दृकश्राव्य कार्यक्रम, कठपुतळ्या, एकामागे एक चित्र बदलत नेणाऱ्या शब्दचित्र पट्ट्या आणि तक्ते आणि सांस्कृतिक उपक्रमांचाही उपयोग केला पाहिजे. उपस्थिती वाढवण्यासाठी शिकणाऱ्यांच्या सोईचे लवचिक वेळापत्रक ठेवावे आणि त्यांच्या कामाची परिस्थिती, त्यांचे वय, स्त्री-पुरुषांच्या समस्या यांचा विचार करावा.

५५. सुयोग्य शैक्षणिक वातावरण अध्यापन-अध्ययनाची गुणवत्ता वाढवते. एक अनुरुप, प्रकाश आणि खेळती हवा असणारी, स्वच्छ आणि नीटनेटकी जागा जी स्त्री-पुरुषांच्या लिंगाधारित आणि सांस्कृतिक गरजा/जाणिवा लक्षात घेउन सुसज्ज केली असेल आणि येण्या-जाण्यासाठी सोयीची असेल, अशी पुरवल्यास हे शक्य होईल.

५६. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एका विशिष्ट कालावधीत वाचन, लेखन आणि अंकज्ञानात प्रभुत्व मिळवण्याऐवजी एक नवी पध्दत म्हणजे शिकणाऱ्यांचा आवाज/म्हणणे ऐकणे आणि त्यांना पूर्णपणे अध्ययन प्रक्रियेत गुंतवून ठेवणे.

## मूल्यमापन आणि प्रशस्तिपत्रक

५७. कार्यक्रमाचे यश आणि फलनिष्पत्ती यांचा मागोवा घेण्यासाठी साक्षरता कौशल्यामधील लोकांच्या वास्तविक क्षमतांचे मूल्यमापन महत्वाचे ठरते. यासाठी एक नियोजनबध्द मूल्यमापन प्रक्रिया आखून ती शालेय शिक्षण पध्दतीद्वारे नियमितपणे अंमलात आणली जाईल. ज्यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाला एक सुयोग्य यंत्रणा उभारावी लागेल. मूल्यमापन प्रक्रियेची मूलतत्त्वे असतील अनाक्रमकता, प्रतिसाद आणि कृतिमध्ये धैर्य आणि आत्मविश्वासाची जडणघडण आणि स्वत्वाची जाणीव. राज्य पातळीवरील चाचण्या सप्टेंबर २०१० च्या पहिल्या आठवडयात आणि त्यानंतर दर तीन महिन्यांनी घेतल्या जातील आणि त्यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण एक नियमावली बनवेल. राज्य प्रशासनाच्या यंत्रणेअंतर्गत स्थानिक शाळा शिक्षकांची मूल्यमापनासाठी परीक्षक म्हणून नेमणूक करता येईल. यापेक्षा वेगळी काही तरतूद केली नसल्यास, यशस्वी मूल्यमापनानंतर शिकाऊ व्यक्ती/नवसाक्षराला एक प्रमाणपत्र दिले जावे ज्यावर स्थानिक प्राथमिक शाळा मुख्याध्यापक आणि पंचायत प्रमुख/सरपंच यांच्या स्वाक्षरी असाव्यात.

५८. मूलभूत शिक्षण यांच्या अन्य घटकांचे (समकक्षता कार्यक्रम) मूल्यमापन राष्ट्रीय मुक्त शाळा संस्था आणि राज्य मुक्त शाळा (NIOS आणि SOS) यांच्या मार्गदर्शक तरतुदींनुसार केले जाईल आणि त्यांच्यातर्फेच यशस्वी उमेदवारांना प्रमाणपत्र दिली जातील. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कौशल्य विकास उपक्रमांचे मूल्यमापन केले जाईल.

## नवीन शिक्षण तंत्रज्ञान

५९. प्रौढशिक्षणाबद्दल दृष्टिकोन आणि त्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी एक प्रभावी साधन म्हणून माहिती आणि संवाद तंत्रज्ञान पुढे येत आहे. यापूर्वीच आकाशवाणी (रेडिओ) आणि दूरदर्शन (टेलिव्हिजन)च्या वापराने अध्यापन करण्याचे यशस्वी प्रयोग केले गेले आहेत. स्थानिक पातळीवर निर्मित परस्परसंवाद रेडिओ आणि कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून अध्ययनकर्ते आणि अध्यापकांदरम्यान माहिती/ज्ञानाची देवाणघेवाण होऊ शकते. आकाशवाणी आणि दूरदर्शन ही साधने सर्वदूर पोचलेली असल्याने साक्षरता प्रसारासाठी अत्यावश्यक अशी एक वाहिनी म्हणून त्यांची क्षमता वर्धित झाली आहे. माहिती संवाद तंत्रज्ञान सूचनेचे एक माध्यम म्हणून साक्षरता शिक्षकांच्या व्यावसायिक कौशल्य विकासासाठी अधिक प्रभावी ठरु शकते. माहिती तंत्रज्ञान अधिक प्रभावी पध्दतीने वापरून तंत्रज्ञानातील दरी दूर करता येते. संगणक प्राविण्य हे केवळ एक व्यावसायिक कौशल्य न समजता तो माहितीचा मार्ग आहे, हे लक्षात घेऊन आणि साक्षरता कौशल्य टिकवण्यासाठी मदत घेऊन माहिती तंत्रज्ञान आणि अन्य तंत्रज्ञानाचा व्यापक प्रमाणावर उपयोग राष्ट्रीय साक्षरता ध्येय प्राप्त करण्यासाठी केला पाहिजे.

## साक्षरता वातावरणाचा प्रसार

६०. आपल्या घरी, शेजारी, कामाच्या ठिकाणी आणि समाजात असलेले छापील आणि दृश्य साहित्य व्यक्तीला साक्षर होण्यास आणि दैनंदिन जीवनात आवश्यक साक्षरता कौशल्य प्राप्त करण्यास प्रवृत्त करते. लक्षणीय संख्येने प्रौढ निरक्षर साक्षरतेच्या दृष्टीने अगदी हलाखीच्या वातावरणात राहतात. त्यांच्या घरात असणाऱ्या परिसरातही वाचण्याजोगा किमान मजकूर नसतो. इतकेच काय पण मैलाचे दगड, बसचा मार्ग अशा साध्या खुणाही नसतात. जोवर नवसाक्षरांना त्यांची गरज आणि अभिरुची याप्रमाणे साहित्य पुरवले जात नाही तोवर संख्येने सतत वाढणाऱ्या नवसाक्षरांच्या वाढत्या शैक्षणिक गरजा पूर्ण होणार नाहीत वृत्तपत्रांची विस्तारित मालिका (ज्यात राज्य साधन केंद्रे किंवा अन्य संस्थांनी भाषेत तयार केलेले फक्त नवसाक्षरांसाठीचे वर्तमानपत्रही असेल), मोठे तक्ते आणि रंजनात्मक, माहितीपर वाचनसाहित्य, तसेच लघुकथा, कांदबऱ्या, नाटके, कविता, लोककथा, काल्पनिक कथा, विनोद आणि चरित्र पुरवली जातील. अशा प्रकारचे सर्व साहित्य सर्व प्रौढ शिक्षण केंद्रांना पुरवले जाईल. त्यानंतर जनवाचन आंदोलन सुरू केले जाईल कारण त्यामुळे नवसाक्षरांमध्ये वाचन-कौशल्य वृध्दींगत होते, असे आढळले आहे.

६१. नवसाक्षरांसाठी लेखन हे एक विशेष कौशल्य आहे. मुक्त शाळा आणि विदेयापीठांच्या माध्यमांतून लेखन कौशल्याचे अल्पकालावधीचे अभ्यासक्रम पूर्ण करून अनेक लाभार्थी प्रशिक्षित व्हावेत यासाठी प्रोत्साहन दिले जाईल जेणेकरून ते नवसाक्षरांसाठी पुरेशा साहित्याची निर्मिती करू शकतील आणि स्वतः साधन व्यक्ती बनू शकतील. पुस्तक प्रकाशन, छपाई तसेच प्रसारण माध्यमे आणि सार्वजनिक वाचनालयांशी निगडीत धोरणे, साक्षरता प्रसाराच्या गरजांशी जोडली जातील. नवसाक्षरांसाठी साहित्य निर्मिती केली जावी यासाठी नॅशलन बुक ट्रस्ट सारख्या संस्थांचे सहकार्य घेण्याचे प्रयत्न केले जातील. केंद्रीय, राज्य आणि अन्य वाचनालयांच्या समूहाशी/जाळ्याशी संपर्क साधून त्यांना वाचनालयांमध्ये नवसाक्षरांसाठी एक कपाट राखून ठेवण्यास सांगितले जाईल.

## साधन सहाय्य

६२. साक्षरता आणि प्रौढ शिक्षण कार्यक्रमासाठी शैक्षणिक साधन सहाय्य पुरवण्यासाठी संपूर्ण राज्यभरात राज्य साधन केंद्रे स्थापन केली आहेत. त्यांची केवळ संख्याच नाही तर क्षमताही वाढवण्यात येईल जेणेकरून प्रौढ आणि निरंतर शिक्षण कार्यक्रमाला पुरेसे शैक्षणिक आणि तांत्रिक साधन साहाय्य पुरवता येईल ज्यात विशेष करून अध्यापन - अध्ययन साहित्याचा विकास आणि साक्षरता व्यावसायिक आणि व्यवस्थापकांचे प्रशिक्षण यांचा समावेश असेल. राज्य साधन केंद्रांखेरीज शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, अनुभवी आणि निष्ठावंत स्वयंसेवक/कार्यकर्ते, स्थानिक प्रशिक्षण संस्थांचे प्रतिनिधी यांच्या पुरेशा प्रतिनिधीत्वासह साधन सहाय्य गट राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, गट आणि ग्रामपंचायत पातळीवर स्थापन केले जातील.

## ७. कार्यक्षमता व्यवस्थापन

## विविध खात्यांतील समन्वय आणि भागीदारी

### सार्वजनिक-सार्वजनिक भागीदारी

६३. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण आणि राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण सक्रियपणे अभियानाचे कार्यक्रम आणि उपक्रम तसेच अन्य विकासात्मक योजना उदा. शिक्षण, ग्रामीण विकास, आरोग्य, महिला आणि बालविकास, दारिद्रय निर्मूलन, कृषी, पंचायत राज आणि समाजकल्याण क्षेत्रातील योजनांच्या समन्वयाचे कार्य करतील. या अभियानासाठी गावपातळीपर्यंत शालेय शिक्षण, साक्षरता आणि उच्च शिक्षण विभागांची एकत्रित कार्यशक्ती घेण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या निरक्षर पालकांना शिकण्यास येण्यासाठी प्रवृत्त करावे म्हणून शिक्षकांना प्रोत्साहन दिले जाईल आणि शिक्षित युवकांना त्यांनी स्वयंसेवी शिक्षक म्हणून मोहिमेत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केले जाईल. ते साक्षरता वर्गांचे शिक्षक म्हणूनही काम करू शकतात. शाळेच्या वेळेनंतरच्या कालावधीत सर्व शिक्षा आभिंयानांतर्गत भौतिक सुविधा साक्षरता कार्यक्रमासाठी वापरता येतील.

### अशासकीय संघटना/संस्था

६४. यापुढे शासकीय संघटना आणि अशासकीय संघटनाची युती अधिक सक्षम करण्यात येईल. अशासकीय संघटना आणि अन्य असे गट ज्यांनी प्रौढशिक्षणाच्या समस्येवर दीर्घकाळ निष्ठा दर्शविली असेल आणि या क्षेत्रात त्यांनी प्रस्थापितपणे निष्कलंक कार्य केले असेल त्यांची सर्व पातळ्यावर साधन गट म्हणून मदत घेण्यात येईल. अभियानाच्या कोणत्याही कार्यक्रमांतर्गत असणारे उपक्रम आणि त्याचे उदिदष्ट साध्य करण्याचे लक्ष्य असणारे नाविन्यपूर्ण कार्यक्रम यांची अंमलबजावणी करण्यासाठी स्वयंसेवी क्षेत्राला प्रोत्साहित करण्यात येईल. त्यासाठी मान्यताप्राप्त खर्चातून अनुदान पुरवण्यात येईल. स्वयंसेवी संस्थेची निवड ही राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाची किंवा त्यांनी निश्चित केलेल्या उप-राज्यस्तरीय अंमलबजावणी एजन्सीची जबाबदारी असेल. तथापि त्याला सहायेय म्हणून कोणत्याही अशासकीय संस्थेची/संघटनेची निवड अभियानाच्या कोणत्याही कामासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण करू शकेल.

### सार्वजनिक खाजगी भागीदारी

६५. स्वयंसेवी संस्था/संघटनाच्या अंशतः सहभागासह प्रौढशिक्षण ही कायम सरकारचीच जबाबदारी राहिली आहे. औपचारिक शाळा व्यवस्थेच्या बाबतीतील प्रभावी युतीच्या तुलनेत प्रौढशिक्षण क्षेत्रात खाजगी आणि औद्योगिक क्षेत्राचे योगदान अगदी कमी राहिले आहे. या अभियानाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खाजगी आणि औद्योगिक क्षेत्र फार महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. अशासकीय संघटनांच्या बाबतीत प्रौढशिक्षणाप्रती कळकळ, अनुकूलता आणि निष्ठा असणाऱ्या खाजगी क्षेत्रातील संस्थांना कोणताही उपक्रम हाती घेण्यासाठी प्रोत्साहन देता येईल आणि त्या कामासाठी

त्यांना मंजूर खर्चातून आर्थिक अनुदानही पुरवता येईल. अशा संस्थांची निवड करणे ही राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण किंवा त्यांनी निश्चित केलेल्या उप राज्यस्तरीय अंमलबजावणी संस्था/एजन्सीची जबाबदारी असेल. तथापि, अभियानातील कोणत्याही कामाच्या सहायेयासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण कोणत्याही एजन्सीची निवड करू शकेल. निधी उभारणे आणि देणग्या मिळवणे यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी आणि भागीदारीचे अन्य प्रकार विकसित करण्यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण निर्णय घेईल. अशासकीय संघटना तसेच खाजगी संस्थांच्या निवडीची प्रक्रिया पूर्णतः खुल्या पध्दतीची आणि पारदर्शक असेल. प्रौढशिक्षणात खाजगी क्षेत्राची भूमिका व्यापक होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी करसवलतीसारखी आर्थिक सूट देण्याबाबत विचार करता येईल.

### आंतरराष्ट्रीय भागीदारी

६६. आंतरराष्ट्रीय अनुभवाचा फायदा मिळावा यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण आंतरराष्ट्रीय संबंधाचे जाळे विणण्यासाठी हरप्रकारे प्रयत्न करेल आणि युनेस्को, युनिसेफ तसेच प्रौढशिक्षणात कार्यरत अन्य आंतरराष्ट्रीय संस्थांशी निकटता साधून कार्य करेल त्याचप्रमाणे परस्पर लाभदायी भागीदारीसाठी उभयपक्षीय आणि बहुपक्षीय व्यवस्थाही करेल.

### कागदपत्रे/दस्तऐवज

६७. प्रभावी आणि सक्षम दस्तऐवज आणि माहिती व्यवस्था यांच्या माध्यमातून माहिती मिळण्याची सुविधा प्रौढशिक्षण कार्यक्रमाला अधिक सक्षम करते. कारण त्यामुळे प्रौढशिक्षणाशी निगडित आणि ताजी माहिती मिळण्याची व्यवस्था सुधारली जाते. शिकाऊ व्यक्तांनी आपल्या यशाची कहाणी इतरांसमवेत वाटून अनुभवावी यासाठीही कागदपत्रे/दस्तऐवज हे एक माध्यम आहे. विशेषतः महिलांच्या बाबतीत त्यांची शिकण्याची उर्मी कायम ठेवण्यासाठी हे प्रयत्न प्रभावी ठरतील. गट किंवा समूह ग्रामपंचायत पातळीवर कागदपत्रे/दस्तऐवज निर्मिती आणि माहिती सहभागाचे एक माध्यम म्हणून महिला गटांमध्ये स्थानिक बातमीपत्र विकसित करता येऊ शकेल.

६८. राज्य साधन केंद्रांची दस्तऐवज निर्मिती क्षमता वाढवण्यात येईल. राष्ट्रीय अभिलेख (दस्तऐवज)केंद्र एकसमान वर्गीकरण असणाऱ्या युनेस्कोने विकसित केलेल्या सॉफ्टवेअर आणि त्यासोबतच्या प्रक्रियांचा वापर करू शकेल. त्यामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटनांशी संपर्क साधणे सोयीचे होईल. तसेच वापरणाऱ्याच्या सोयीचेही होईल. महत्त्वाच्या माहितीचे दस्तऐवज शास्त्रीयदृष्टया तयार करण्यासाठी आवश्यक संसाधने योजिली जातील. यामध्ये प्रौढशिक्षण, सूची, संक्षेपीकरण, ग्रंथसंदर्भ सूची, भाषांतर सेवा, प्रभावी साक्षरता/प्रौढशिक्षण पध्दतींची माहिती, साहित्य/प्रशिक्षण साहित्य आणि कार्यक्रमांचे कोश, संशोधनाचे संकलन, संदर्भ सेवा पुरवणे याबद्दल राष्ट्रीय स्तरावरील माहिती अंतर्भूत असेल.

## संशोधन

६९. अन्य कोणत्याही गोष्टी इतकेच उपयोजित संशोधन हे संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे आहे. प्राथमिक, साक्षरोत्तर आणि निरंतर शिक्षण तसेच स्त्री-पुरुष भेद समस्या, अभिलेख/दस्तऐवज, संशोधन निष्कर्षांचा प्रसार यातील संशोधनाला चालना देण्यास अभियान सर्वाधिक प्राधान्य देईल. संबंधित विषयांवरील संशोधन अभ्यास सक्षम संस्थांना सोपवण्यात येईल. त्यानंतर, प्रौढशिक्षणाच्या विविध पैलूंवर संशोधनात्मक (डॉक्टरल) आणि संशोधनोत्तर (पोस्ट-डॉक्टरल) पदवीसाठी कार्य करण्यास संशोधकांना प्रोत्साहित करावे यासाठी विदेयापीठ आणि नामवंत समाजशास्त्र संशोधन संस्थाना प्रवृत्त केले जाईल. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणसुध्दा त्यांनी निवडलेल्या विषयांसाठी नामवंत विदेयापीठातील संशोधनाला प्रायोजकत्त्व (शिष्यवृत्ती) देईल.

## संनियंत्रण आणि मूल्यमापन

७०. योजनेच्या अंमलबजावणीत सामील होणाऱ्या प्रत्येक संस्था/एजन्सीसाठी कार्याची परीमाणे विहित केली जातील. एक वेब आधारित व्यवस्थापन माहिती यंत्रणा (MIS) स्थापन केली जाईल, जी प्रत्यक्ष संनियंत्रण करेल आणि कार्यक्रमाची निष्पत्ती आणि परिणाम सर्वाधिक सकारात्मक व्हावेत यासाठी निर्णायक असेल. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण, राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण आणि जिल्हा मंडळ त्यांच्या पातळीवरील प्रगतीचा आढावा घेतील. प्रत्येक शिकाऊ व्यक्तीचे नाव आणि त्याची प्रगती सार्वजनिक ठिकाणी लावली जाईल. संनियंत्रण एकतर्फी न होता ती एक द्विपक्षीय प्रक्रिया असेल. कार्यक्षेत्रावर नेमके काय घडते आहे याचा प्रतिसादात्मक मागोवा सुयोग्य वाहिन्यांतर्फे घेतला जाईल आणि त्याच वाहिन्यांच्या मार्फत कार्यक्षेत्रावर सुधारणांसाठीच्या सूचना पाठवल्या जातील.

७१. या कार्यक्रमात आर्थिक आणि मानवी संसाधने प्रचंड प्रमाणात तैनात करण्यात येणार आहेत. त्यासाठी उच्च गुणवत्ता मूल्यमापन करणे स्वाभाविक आणि अत्यावश्यक आहे, ज्यामुळे बचत आणि भविष्यकालीन योजनांसह विस्तृत विश्लेषण सुलभपणे होऊ शकेल. समकालीन, सारांशात्मक आणि परिणामकारक मूल्यमापनासाठी तपशीलवार प्रक्रिया विहित केली जाईल. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील संशोधनाद्वारे साक्षरतेची माहितीही पुरवली जाईल. मूल्यमापन कार्यासाठी दीर्घकाळ निर्दोष पध्दतीने कार्य केलेल्या तज्ज्ञ आणि अनुभवी संस्थांची नेमणूक केली जाईल. सहभागाद्वारे सुधारणा घडवण्यासाठी मूल्यमापन प्रक्रिया एक साधन बनेल. संपूर्ण खुलेपणा आणि पारदर्शकता हे संपूर्ण मूल्यमापन प्रक्रियेसाठी परवलीचे शब्द असतील.

## निधी वितरण व्यवस्थापन

७२. अनुसूचित/शेडयुल बॅकांकडे उपलब्ध असलेली कोअर बॅकींग सुविधा वापरून सर्व अंमलबजावणी संस्थांना वेळेत निधी मिळावा यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण एक यंत्रणा तयार करेल.

वेब आधारित निधी वितरण आणि नियंत्रण व्यवस्था अंमलात येईपर्यंत राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण अनुदानाची सध्याचीच पध्दत चालू ठेवू शकेल.

## नियोजन

### मार्गदर्शक तत्वे

७३. जबाबदारी, पारदर्शकता, सहभागात्मक व्यवस्थापन आणि कार्यात्मक भूमिकांची स्पष्टता ही योजना प्रक्रिया आणि व्यवस्थापनाची आवश्यक वैशिष्ट्ये असतील. त्र्याहत्तराव्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने या कार्यक्रमाच्या जिल्हा आणि उच्च जिल्हा पातळीवरील अंमलबजावणीत पंचायतराज संस्थांच्या भूमिकेचे महत्त्व राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने ओळखले आहे. तथापि कार्यातील प्रत्यक्ष भूमिका ठरवणे राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाच्या अखत्यारित आहे. आपण स्वीकारलेली योजना प्रक्रिया नियोजनातील आवश्यक बाबी विशेषतः विकेंद्रीकरण आणि उन्नतीकरण दृष्टीकोनाशी सुसंगत आहे का, याची खात्री करून घेणे हे राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाचे आद्य कर्तव्य आहे. प्रभावी नियोजनासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण प्रकल्प नियोजनाची अधिक चांगली साधनें ऑनलाइन उपलब्ध करून देईल.

७४. हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने लोकांचा कार्यक्रम म्हणून तयार केला गेला आहे. हा लोकांचा, लोकांसाठी, लोकांनी केलेला कार्यक्रम आहे. कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणीत सर्व सहभागधारकांना आणि विशेषतः तळागाळातील पातळीवर कार्य करणाऱ्यांना आपले म्हणणे/मत मांडण्याचा अधिकार असावा तसेच यात त्यांचा सहभागही असावा. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण आणि राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण यांची भूमिका प्रोत्साहन आणि सुविधा तसेच साधन पुरवठादारांची असेल. त्या अनुषंगानेच सर्व व्यवस्थापन आणि पर्यवेक्षण यंत्रणांची स्थापना व्हायला हवी. या यंत्रणेत विशेषतः निर्णय प्रक्रियेत महिलांचे पुरेसे प्रतिनिधीत्व आहे, याबददलही खात्री करून घेणे गरजेचे आहे. विशेषतः राज्य साधन केंद्र आणि आवश्यक क्षमता असणाऱ्या अन्य संस्थांच्यामार्फत नियोजन आणि अंमलबजावणी संस्था/एजन्सीजना पर्याप्त प्रमाणात साधन पुरवठा केला जाईल.

७५. कार्यक्रमाची व्यूहरचना, मुख्य आराखडा, मर्यादा आणि मार्गदर्शक तत्त्वे याबाबत राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी कालावधीदरम्यान करावयाच्या आवश्यक बदल/सुधारणा, भारत सरकारने मंजूर केलेल्या चौकटीत असतील तर त्या प्रत्यक्षात आणण्याचा अधिकार राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाकडे असेल. अभियानाच्या आवश्यकतेनुसार राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण सल्लागार आणि बाह्य सेवा साधनाकडून सेवा घेऊ शकते. यासाठीचा खर्च, व्यवस्थापन/राष्ट्रीय साधन गटासाठी असलेल्या स्वतंत्र निधीतून केला जाईल.

**नियोजन प्रक्रिया**

७६. गावाच्या ग्रामपंचायत पातळीपर्यंत उपक्रम आणि जबाबदाऱ्या नेमून दिल्या आहेत. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने नेमलेली पंचायत किंवा संस्था/एजन्सी या ग्रामपंचायत पातळीवरील कृती आराखडा तयारीच्या सूक्ष्म नियोजनासाठी जबाबदार असतील. या सूक्ष्म नियोजनात सर्वेक्षण, माहिती संकलन, जनजागृती, विविध पातळ्यांवरील कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाची वेळापत्रके, अध्यापन-अध्ययन साहित्याची उपलब्धता आणि वितरण, शिकणाऱ्या व्यक्तींच्या शिक्षणाचे मूल्यमापन, आर्थिक गरजा इ. बाबी समाविष्ट असतील. अभियानाच्या अंतर्गत असणारे सर्व कार्यक्रम आणि उपक्रम विचारात घेऊनच ग्रामपंचायत पातळीवरील योजना तयार करता येईल. गट त्यातील सर्व ग्रामपंचायतींना एकत्र करून गटाला नेमून दिलेला उपक्रम निधीही त्यात समाविष्ट करेल. जिल्हा अंमलबजावणी संरचना सर्व गटांच्या योजनांचे साकल्याने अवलोकन करेल आणि तिला सोपवलेले स्वतःचे उपक्रम निधी त्यात समाविष्ट करेल आणि राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण सर्व जिल्हा योजनांना एकत्र करेल आणि त्यात आपले राज्य उपक्रम निधी सुपूर्द करेल. याप्रकारे राज्य योजना ही सर्व जिल्हा योजनांचे संकलन आणि त्याला जोडून SLMAचा स्वतःचा उपक्रम निधी अशी असेल.

७७. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण प्रत्येक राज्य योजनेचे मूल्यमापन करेल आणि केंद्रसरकारच्या हिश्श्याच्या निधीवर आधारित प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरी राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाला जारी करेल.

**व्यवस्थापन आराखडा**

७८. अभियानाच्या पध्दतीने कार्यक्रम राबवला जाईल. राज्य सरकार, जिल्हा प्रशासन आणि पंचायत राज संस्था सामिल करून राष्ट्रीय ते राज्य, जिल्हा, गट आणि ग्रामपंचायत पातळीपर्यंत संस्थात्मक आराखडा आखला जाईल. या यंत्रणारचनेत विशेषतः निर्णय प्रक्रियेत महिलांना पुरेसे प्रतिनिधीत्व दिले गेले असल्याची खात्री करून घेतली पाहिजे.

७९. मानव-संसाधन विकास मंत्रालयाची एक स्वायत्त शाखा असलेले राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण हे राष्ट्रीय पातळीवरील प्रमुख/नोडल संस्था/एजन्सी म्हणून कार्य करेल. राज्य/स्वयंसेवी संस्थांना निधी वितरीत करणे, साधन सुसज्जता, जनमोहीम, निरक्षरता आणि प्रौढशिक्षणासंबंधी राष्ट्रीय माहिती ठेवणे, प्रसिध्दी, तांत्रिक अध्यापन सहाय्य, संशोधन, संनियंत्रण आणि मूल्यांकन इ. सह योजनेचे एकूण नियोजन आणि व्यवस्थापन यासाठी जबाबदार असेल.

८०. या आदेशाचे पालन करण्यात राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाला सहाय्य म्हणून अभियानाला तांत्रिक आणि व्यवस्थापकीय मदत पुरवण्यासाठी राष्ट्रीय साधन गटाची (NRG) स्थापना करण्यात येईल. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण किंवा राष्ट्रीय साधन गटात कोणत्याही कायमस्वरुपी कर्मचाऱ्याची नेमणूक करता येणार नाही. तथापि, राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाच्या

(NLMA) कार्यकारी समितीने ठरवल्याप्रमाणे सामान्य व्यवस्थापन, अध्यापनशास्त्र, जनजागृती, मूल्यमापन, माहिती तंत्रज्ञान किंवा अन्य उपक्रमांसाठी (NLMA) अल्पमुदत/मध्यममुदतीचे सल्लागार आणि सहाय्यक सेवांची तीन वर्षापेक्षा अधिक भरणार नाही इतक्या कालावधीकरता नेमणूक करू शकते.

८१. राज्य पातळीवर कार्यक्रमाची तयारी, अंमलबजावणी आणि संनियंत्रण यासाठी राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण जबाबदार असेल. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने मान्य केल्याप्रमाणे कंत्राटी कर्मचारी नेमण्याखेरीज राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाला एक पूर्ण वेळ सचिवालय पुरवण्याची जबाबदारी संबंधित राज्य सरकारांवर असेल.

८२. राज्य योजना ही सर्व जिल्हा योजनांचा एकत्रित संच असेल. राष्ट्रीय मार्गदर्शक प्रणालीच्या चौकटीत स्थानिक विशिष्ट परिस्थिती विचारात घेऊन अंमलबजावणी पध्दतीत नाविन्य आणि कार्यक्रमांचे वैविध्य प्रतिबिंबित होईल याप्रकारे सखोल चर्चा आणि मार्गदर्शनाद्वारे राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण अभियानाची योजना आणि मार्गदर्शनावर आधारित जिल्हा प्रौढशिक्षण योजना तयार करेल.

८३ राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण आणि राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण समाजाच्या सर्व विभागातील अनुभवी आणि निष्ठावंत व्यक्तींची सेवा पुरवण्यासाठी प्रोत्साहन देईल, या व्यक्तींमध्ये केंद्र/राज्य सरकारी कर्मचारी, जिल्हा प्रशासन, विदेयापीठ/महाविदेयालये किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांतील कर्मचारी समाविष्ट असतील साक्षरता आणि निरंतर शिक्षण कार्यक्रमाच्या कामासाठी या व्यक्तींना त्यांची संबंधित कार्यालये तात्पुरत्या बदलीने त्यांना कार्यमुक्त करतील त्यांच्या कामाचा कालावधी हा त्यांच्या मूळ कार्यालयात सेवाकाल म्हणून गणला जाईल तसेच या कालावधीसाठी त्यांचे वेतन आणि भत्ते त्यांच्या मूळ कार्यालयातूनच अदा केले जातील

८४. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण हे राज्य सरकारच्या हिश्यासह निधीचे वितरण, त्यांचे जिल्हा अंमलबजावणी संस्थांना वाटप, संनियंत्रण आणि राज्यातील योजनेच्या प्रगतीचा आढावा, उपयोगिता प्रमाणपत्रांचे संकलन जिल्ह्यांकडून करून ते राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाला सोपवणे यासाठी जबाबदार असेल. तसेच ते क्षमता बांधणी, क्षेत्रीय मूल्यमापन आणि अध्यापन साहाय्यासाठीही जबाबदार असेल आणि राज्यतील कार्यक्रमांसाठी राज्य साधन गट म्हणून कार्य करेल.

८५. जिल्हा पातळीवर जिल्हा प्रशासन किंवा जिल्हा परिषद या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार मानले जावे. जिल्हा परिषदेच्या आश्रयाखाली कार्य करण्यासाठी एक विशेष समिती आणि जिल्हा साधन गटाची स्थापना करावी लागेल. ग्रामपंचायती अंतर्गत सर्व गावांमध्ये कार्यपातळीवर समाजातील समुदायांसह ग्रामपंचायत ही अंमलबजावणी संस्था असेल. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विविध पातळ्यांवरील समित्यांची रचना, सचिव सहाय्य आणि

हाती घेण्याची कामे यांचा सूचक व्यवस्थापन आराखडा इथे जोडपत्र-१ मध्ये दिला आहे.

## ८. वित्त आणि नियोजन

८६. अकराव्या योजनेच्या शेवटच्या तीन वर्षाच्या कालावधीत 'साक्षर भारत' साठी संपूर्ण आर्थिक तरतूद रु. ६५०२. ७० कोटी इतकी असून त्यातील केंद्राचा वाटा रु. ४९९३. ०२ कोटी इतका आहे. केंद्र आणि राज्य सरकार दरम्यान निधी वाटपाचे प्रमाण अनुक्रमे ७५:२५ या गुणोत्तरात असेल आणि सिक्कीमसह उत्तरपूर्व राज्यांच्या बाबतीत हे प्रमाण अनुक्रमे ९०:१० इतके असेल. राज्यांना वितरित करण्यात येणारा निधी या कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या विविध राज्यांच्या जिल्ह्यामधील निरक्षर प्रौढ महिलांच्या संख्येवर आधारित असेल. अभियान जसे प्रगतीपथावर पुढे जाईल तशी खर्चाची पध्दत एकंदर अंतर्गत वितरणाप्रमाणे होईल.

८७. व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मूल्यमापनासह अभियानाच्या सर्व घटकांसाठी कमाल खर्च मर्यादा विहीत करण्यात आल्या आहेत. उपक्रमांनुसार आर्थिक शर्ती जोडपत्र-खखखख मध्ये दिल्या आहेत.

## ९. राष्ट्रीय साक्षरता कोष

८८. निधीची तरतूद नसणाऱ्या साधनांसाठी सार्वजनिक देणग्या आणि अनुदानात वाढ करण्यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण राष्ट्रीय साक्षरता कोष नामक निधीची स्थापना करेल. राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण त्याच्या कार्याच्या पध्दतीचे स्वरुप निश्चित करेल. निधीद्वारे मिळालेला पैसा यशस्वी साक्षर आणि साक्षरता शिक्षकांना त्यांच्या कार्यगुणवत्तेवर आधारित पुरस्कार देण्यासाठी वापरता येईल.

## १०. मैलाचे दगड/महत्वाचे टप्पे

८९. अभियानाचे महत्त्वाचे टप्पे खालील प्रमाणे असतील

- ◈ अभियानाचा प्रारंभ - ८ सप्टेंबर २००९
- ◈ राज्यांमध्ये कार्यक्रमाची सुरुवात - १४ डिसेंबर २००९
- ◈ सज्जता/जागृती (पहिला टप्पा) - सप्टेंबर - डिसेंबर २००९
- ◈ वर्गाची सुरुवात - जानेवारी २०१०
- ◈ राष्ट्रीय चाचणी/मूल्यमापनाची पहिली फेरी - सप्टेंबर २०१०

| उपक्रम | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. साक्षरता कार्यक्रमांतर्गत शिकाऊ व्यक्ती - प्राथमिक आणि साक्षररोत्तर | १०० लक्ष | २५० लक्ष | ३५० लक्ष | ७०० लक्ष |
| २. प्राथमिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत शिकाऊ व्यक्ती (समकक्षता) | १ लक्ष | ६ लक्ष | ८ लक्ष | १५ लक्ष |
| ३. व्यावसायिक शिक्षण (कौशल्य विकास) कार्यक्रमांतर्गत शिकाऊ व्यक्ती | ४ लक्ष | ५ लक्ष | ५ लक्ष | १४ लक्ष |
| ४. निरंतर/आजीवन शिक्षण (ची संख्या) | २५,००० | ६०,००० | ८५,००० | १,७०,००० |

## ११. योजनेचा कालावधी

९०. भारत सरकारने अन्य निर्णय न घेतल्यास ही योजना ३१.३.२०१२पर्यंत कार्यरत राहील. साक्षरता कार्यक्रमाची मुदत १८ महिन्यांची असेल. समकक्षता, व्यावसायिक आणि निरंतर शिक्षण कार्यक्रम अखंडपणे मंजुरी दिनांकापासून ३१.३.२०१२पर्यंत चालतील.

## १२. मार्गदर्शक बाबी

९१. ही योजना राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अमलात आणली जाईल. निधी वितरण व्यवस्थापन, वितरणाची वारंवारता आणि प्रमाण, सार्वजनिक देणग्या स्वीकारणे आणि त्यांचा वापर, अंमलबजावणीची पद्धत, जनजागृती, प्रसिद्धी आणि जाणीव जागृती, व्यवस्थापन आराखडा, संनियंत्रण आणि मूल्यमापन इत्यादीसह कार्यक्रमासाठीच्या मार्गदर्शक सूचना विस्तृतपणे तयार करणे तसेच त्यात वेळोवेळी सुधारणा करणे यासाठी राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाला अधिकार देण्यात आले आहेत. या मार्गदर्शक सूचनांच्या बाबतीत त्यांचा अर्थ लावण्यासंदर्भात काही वाद उद्‌भवल्यास राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

# जोडपत्र - १

## सूचक व्यवस्थापन संरचना

## ग्रामपंचायत पातळीवर : पंचायत लोकशिक्षाा समिती

**रचना**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | पंचायतीचा अध्यक्ष |
| उपाध्यक्ष | (सदस्यांमधून निवडलेला) |
| सदस्य | (५०% महिला) |
| पंचायतीच्या लोकनियुक्त महिला प्रतिनिधी | २ |
| मुख्याध्यापक/शिक्षक<br>(जो पंचायतीने स्थानिक शाळेतून निवडला असेल) | १ |
| सामाजिक प्रतिनिधी<br>(अनुसूचित जाती/जमाती/अल्पसंख्यांक यांना<br>प्रमाणात प्रतिनिधीत्वासह) | ३ |
| शिक्षण समितीचे सदस्य सचिव | १ |
| (महिला मंडळ/एस एच जी सदस्य) | १ |
| उपयोगकर्ता गट | २ |
| सामाजिक कार्यकर्ता | १ |
| साक्षर/मत निर्माते (ज्येष्ठ सरकारी कर्मचारी/डॉक्टर ) | १ |
| सदस्य सचिव - ज्येष्ठ प्रेरक | १ |

सचिवालय - दोन पूर्णवेळ कंत्राटी कर्मचारी (ज्येष्ठ प्रेरक आणि प्रेरक)

**कार्य**

लोकशिक्षण केंद्र तसेच त्यांच्या खालील उपक्रमांचे व्यवस्थापन.

- ग्रामपंचायत क्षेत्रातील अशिक्षित महिला आणि स्वयंसेवी शिक्षकांना शोधणे.
- अध्यापन -अध्ययन साधने आणणे, साठवणे, पुरवठा करणे आणि सूचित शिक्षकांना उपलब्ध करून देणे.
- ग्रामपंचायत पातळीवर सूक्ष्म व्यवस्थापन आणि साक्षरता वर्गांची देखरेख.
- राष्ट्रीय पातळीवरील चाचणी/विद्यार्थ्यांचे मूल्यमापन यासाठी व्यूहरचनात्मक सहाय्य करणे.
- साक्षरता शिक्षकांना मानधन अदा करणे.
- मूल्यमापन
- १००% महिला साक्षरता साध्य केल्यानंतर पंचायत महिला साक्षरता पुरस्कारासाठी दावा करणे.

- पंचायतीचा निधी तसेच पुरस्काराच्या रकमेतून निरंतर शिक्षण कार्यक्रमासाठी लोक शिक्षण केंद्राची स्थापना करणे.

## गटपातळी : गट लोक शिक्षण समिती

**रचना**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | गट पंचायतीचा अध्यक्ष |
| सदस्य | : | गट पंचायती मधील सर्व लोकनियुक्त महिला प्रतिनिधी शाळा/महाविद्यालयीन शिक्षक समाजातील तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी इ. |
| सदस्य सचिव | : | गट विकास अधिकारी |
| सचिवालय | : | दोन पूर्णवेळ कंत्राटी कर्मचारी |

**कार्य**

- गट पंचायत पातळीवरील साक्षरता योजना तयार करणे.
- साक्षरता वर्गांची देखरेख
- ग्रामपंचायत आणि जिल्हा पातळी एजन्सी दरम्यान समन्वय साधणे.
- गटपातळीवरील कार्यक्रमाचे संनियंत्रण करणे.

## जिल्हा पातळी : जिल्हा लोक शिक्षण समिती

**रचना**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | जिल्हा पंचायत अध्यक्ष/(जिल्हा परिषद अध्यक्ष) |
| सदस्य | : | जिल्हाधिकारी - समन्वयक<br>निवडक गट आणि ग्रामपंचायत अध्यक्ष (त्यापैकी ५०% महिला)<br>निवडक विभागांचे जिल्हा प्रमुख<br>स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी<br>शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते<br>जन शिक्षण संस्थानचे संचालक |
| सदस्य सचिव | : | जिल्हा पंचायत (परिषद) मुख्य कार्यकारी अधिकारी |
| सचिवालय | : | समितीचा पूर्णवेळ अधिकारी जो अन्य कोणतीही जबाबदारी घेणार नाही. समितीचे कामकाज सांभाळण्यासाठी राज्य शासन किमान सहाय्यक कर्मचारी वर्ग देईल. याशिवाय समिती आणखी जास्तीत जास्त ५ कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक करू शकेल. |

**कार्य**

- जिल्हा पातळीवरील साक्षरता अभियानाचे नियोजन करणे.
- सर्व ग्रामपंचायत प्रमुखांशी व्यूहरचनेबाबत संवाद साधणे.
- जन जागृती आणि वातावरण निर्मिती उपक्रम हाती घेणे.
- महिला साक्षरता प्रबोधनाचे उपजिल्हा पातळीवर आणि जिल्हावार ग्रामसभांव्दारे संघटन करणे.
- शिकाऊ व्यक्ती, शिक्षक, मूल्यमापक, पंचायती या सहभागी घटकांसाठी कार्यसूची तयार करून त्यांच्या भूमिका निश्चित करणे.
- वार्षिक जिल्हा दिनदर्शिका तयार करणे (सप्टें. ८ ते सप्टें ७)
- अध्यापन - अध्ययन साहित्य पंचायतीना पुरवण्याबाबत नियोजन करणे.
- अध्यापन - अध्ययनावर देखरेख ठेवणे.
- स्वयं सहाय्यता गट आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा गटांमार्फत पूरक कृतींचे आयोजन करणे.
- १ सप्टें. २०१० रोजी सुरु होणाऱ्या वर्षापासून प्रत्येक वर्षी सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयात सामायिक चाचणी/मूल्यमापनाचे नियोजन तथा अंमलबाजवणी करणे.
- मानधन तसेच पंचायत महिला साक्षरता पुरस्काराची रक्कम अदा करणे.
- निधीच्या समन्वयाद्वारे शिक्षण सातत्यासाठी लोक शिक्षण केंद्र उभारणे.
- या कार्यक्रमाविषयी सार्वजनिक क्षेत्रातील सर्व संबंधित माहिती उपलब्ध करणे.

## राज्य पातळी - राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण

**संचालक मंडळ रचना**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मुख्यमंत्री/शिक्षणमंत्री |
| सदस्य | : | विख्यात शिक्षणतज्ज्ञ |
| | | निर्वाचित प्रतिनिधी |
| | | स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी |
| | | विख्यात सामाजिक/साक्षरता कार्यकर्ते |
| | | माध्यम तज्ज्ञ इ. |
| सदस्य सचिव | : | शिक्षण सचिव (प्रौढ शिक्षण प्रभारी) |
| सचिवालय | : | राज्य शासन एक पूर्णवेळ सचिव तसेच सहा कंत्राटी कर्मचारी पुरवेल. |

**कार्य**

- समाजाच्या सर्व क्षेत्रातील अनुभवी आणि निष्ठावंत व्यक्तींची सेवा मिळवण्यासाठी राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण प्रोत्साहित करेल तसेच सेवा सुनिश्चित करेल. साक्षरता आणि निरंतर शिक्षण कार्यक्रमांसाठी या व्यक्तींना त्यांच्या आस्थापनेतून कार्यमुक्ती देण्यात येईल. त्यांच्या कार्याचा

कालावधी त्यांच्या मूळ कार्यालयातील सेवाकाळ म्हणून धरला जाईल तसेच त्यांना या कालावधीतही मूळ कार्यालयातूनच वेतन आणि भत्ते दिले जातील.

- साक्षरतेसाठी राज्य योजना विकसित करणे.
- राज्यभरात जागृतीपर मोहिम राबविणे
- राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाकडून प्राप्त निधीच्या वितरणाची जबाबदारी राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणावर असेल. तर राज्य अंमलबजावणी एजन्सी आणि लेखा व्यवस्थापनाला जबाबदार असेल.
- जिल्हा साक्षरता योजनेचे पर्यवेक्षण करणे.
- प्रोत्साहन भत्ता, पुरस्कार आणि लोक शिक्षण केंद्रांसाठीच्या विविध कार्यक्रमांमध्ये समन्वय साधणे.
- नियमित मूल्यमापन होईल याची खात्री करणे आणि कार्यक्रमाविषयी सार्वजनिक क्षेत्रातील सर्व माहिती उपलब्ध करणे.

## राष्ट्रीय पातळी : राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण

**संचालक मंडळ रचना**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मानव संसाधन विकास मंत्री |
| उपाध्यक्ष | : | मानव संसाधन विकास राज्यमंत्री |
| सदस्य | : | सूचना आणि प्रसारणमंत्री, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री, युवक कार्य आणि क्रीडामंत्री, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री, महिला आणि बालविकास मंत्री, ग्रामीण विकास मंत्री, पंचायत राज्यमंत्री, अल्पसंख्याक कार्यमंत्री, आणि विविध विभागांचे/खात्यांचे प्रतिनिधी, अशासकीय संघटना. |
| सदस्य सचिव | : | सहसचिव (प्रौढ शिक्षण) |
| सचिवालय | : | सहसचिव प्रौढ शिक्षण हा राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरणाचा पदसिध्द महासंचालक असेल. नेहमीच्या सहाय्यक कर्मचारी वर्गाबरोबरच दोन अतिरिक्त महासंचालक आणि दोन संचालक असतील. |

**कार्य**

- ८ सप्टेंबर २००९ रोजी मोहिम तयारी प्रारंभाची निश्चिती करणे.
- राज्य पातळी मोहिमेचे पर्यवेक्षण करणे
- मोहिमेला माध्यमांच सहकार्य घेणे
- मूल्यमापनाचे पर्यवेक्षण
- राज्यांना निधीची मदत
- समन्वयासाठी दिशादर्शन
- असामान्य कार्यासाठी पुरस्कार आणि प्रोत्साहन

# जोडपत्र -२

गट पंचायतीची संख्या, ग्रामपंचायतीची संख्या तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या जन शिक्षण संस्थान सह प्रौढ महिला साक्षरतेचें प्रमाण ५०% किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या जिल्हयांची यादी.

विवरणपत्र - ३६५ जिल्ह्यांची राज्यांनुसार यादी.

प्रौढ महिला साक्षरतेचे प्रमाण ५०% पेक्षा कमी असलेल्या जिल्हयातील गट पंचायती आणि ग्राम पंचायतींची संख्या - २००१.

## जोडपत्र -३

## उपक्रमानुसार आर्थिक नियम

| क्र. | उपक्रम घटक | कमाल मर्यादा |
|---|---|---|
| १. | प्रौढ शिक्षण केंद्राची स्थापना | बिन आवर्ती खर्च : नव्या केंद्रासाठी रु. ६०,०००/- आणि जुन्या केंद्रासाठी रु. २५,०००/-<br>आवर्ती खर्च : रु. ७५,०००/- प्रतिवर्ष/प्रति केंद्र |
| २. | प्राथमिक साक्षरता<br>अ. स्वयंसेवकांमार्फत<br>ब. निवासी निदेशकामार्फत<br>क. निवासी शिबीरे<br>ड. प्राथमिक साक्षरता स्वयंसेवकांना शिक्षण शुल्क. | <br>प्रत्येक शिकाऊ व्यक्तीमागे रु. २३०/-<br>रु. ४०,०००/- प्रति निवासी गट/प्रतिवर्षी ३० शिकाऊ व्यक्ती<br>रु. १२५/- प्रतिदिन/प्रति शिकाऊ व्यक्ती ४५ दिवस |
| ३. | प्राथमिक शिक्षण<br>(समकक्षता कार्यक्रम) | रु. ५,९६८/- प्रति शिकाऊ व्यक्ती (नियम) |
| ४. | सामाईक घटक<br>अ. सर्वेक्षण आणि समाज संघटना<br>ब. प्रशिक्षण | <br>रु. २५,०००/- प्रति (ग्रामपंचायत)<br>रु. १,०००/- प्रती साक्षरता अधिकारी |
| ५. | व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मूल्यमापन | कार्यक्रम खर्चाच्या ४% |
| ६. | राष्ट्रीय संसाधन सहाय्य | रु. ७८.५० कोटी (ठोक रक्कम) |